# १०१ अेकशे अेक चमत्कार



वाचनालय, ठाणें
वा·वा
दा. क्र. १५०९६

IRBK-0115096

श्री. कोठारी
ऊर्फ
श्री सद्गुरुनाथ

८१४२१/३८८६
२।३।८४
वाचनालय

मराठी ग्रंथ [illegible], ठाणें. [illegible] शाखा.
अनुक्रम ८१४२१

IRBK-0115096

|| श्रीराम ||

नम्र विनंती,

आपली कोणतीहि अडचण किंवा कोणतेहि काम असो अगर नसो आपण सदर पुस्तकाचे लेखक

**श्री. कोठारी**

उर्फ

**सद्‌गुरुनाथ**

यांची एकदा तरी अवश्य भेट घ्यावी. कोणत्याही दिवशी सकाळी ९ ते १ व दुपारी ४ ते ८. त्यांतून अगदीच अत्यंत महत्त्वाचे काम असेल तर केव्हाहि भेट घ्यावी.

आदि प्रकाश स्थान

**कमल निवास,**

**वाभई राममंदिर रोड,**

**बोरीवली ( पश्चिम ) मुंबई ९२.**

—प्रकाशक

प्रकाशक :—

**गो. वि. जोशी,**

जे. विनायक प्रकाशन,

मेयर बिल्डिंग, मुंबई २८.

प्रकाशन दिन १७ फेब्रुवारी १९७४

सर्व हक्क लेखकाधीन

किंमत ७ रु. साडेचार

मुद्रक :—

**अतुल पुराणिक,**

धूतपापेश्वर प्रेस,

पनवेल-कुलाबा.

एकशे एक चमत्कार
एकशे एक चमत्कार
एकशे एक चमत्कार
एकशे एक चमत्कार
एकशे एक चमत्कार
एकशे एक चमत्कार
एकशे एक चमत्कार
एकशे एक चमत्कार
एकशे एक चमत्कार

# एकशे एक चमत्कार

(मंत्र, विभूति, नामजप द्वारे कोणत्याहि संकटाचे निवारण)


—: लेखक :—

**कोठारी**

ऊर्फ

**श्री सद्गुरुनाथ**



…यक प्रकाशन, मुंबई २८.

# एकशे एक संतांचा परि

: लेखक :

डॉ. भालचंद्र आकलेकर,
एम. ए., एम.कॉम.,
पी. एच्. डी., डि.लीट.

जे. विनायक प्रकाशन
मेयर बिल्डिंग, दादर,
मुंबई ४०० ०२८

# लेखकाचे निवेदन

या चमत्कार ग्रंथात निरनिराळया चमत्कारांची नोंद
हे सर्व चमत्कार अनेक लोकांनी अनुभवलेले आहेत.
य नमस्कार नाही असे म्हणणे ही सर्वसामान्य पणे
प्रथा रमेश्वराची शक्ति निरनिराळया चमत्कारात चैतन्य पावून
कसकशं उदायी ठरली त्याचे विस्तृत वर्णन प्रस्तूत ग्रंथात आलेले आहे. या चमत्कारांचा अनुभव येण्यापुर्वी त्यांच्या कडून मिळविलेल्या माहितीनुसार त्यांना कोणत्या शक्तिचा अचुक उपयोग होईल ते प्रथमतः शोधून काढून उपाय सुचविले बहूतांशी सर्व चमत्कार नामजप, विभूती व प्रार्थना या व अशा इतर गोष्टीद्वारे घडविले गेले. तसेच या चमत्कारापैकी काही चमत्करात लेखकाला मुक्या प्राण्यानी द्योतके तयार करून संदेश दिले. व ते संदेश मी त्या त्या लोकांना सांगितले व त्यांच्या कडून करवून घेतले अशा बद्दलची नोंद प्रस्तूत ग्रंथात आहे. त्याचप्रमाणे मी लिहीलेल्या "जगात अशक्य असे काही नाही" या ग्रंथात ही पण मुके प्राणी मानवावर कसकसे उपकार करतात याबद्दलची काही उदाहरणे आहेत.

ज्यांना कोणाला हा ग्रंथ वाचावयाचा असेल त्यांनी जरूर वाचावा याचे दुसरे कारणही पण असे आहे की, वरील ग्रंथात निरनिराळया प्रकरणांची अनुभविक माहिती दिलेली आहे. आपणास इतर काही ग्रथांत जे वाचावयास मिळाले नाही. ते या ग्रथात आलेले आहे. पुढील चमत्कारामध्ये अनेक उपाय सुचविण्यात आले ते लेखकाने प्रथमतः अतिंद्रिय शक्तिद्वारे विचारणा करून प्रार्थना, विभूती, नामजप असे निरनिराळे उपाय लोकांना सुचवीले. अचुक

कोणती शक्ति लागु पडेल ते प्रथमतः शोधून काढले कूंकू, लाह्या, शेंदूर, पिंजर, लिंबू वगैरे वस्तूंचा उपयोग लेखकाने केलेला नाही. एखादेच ठिकाणी जेथे ओवाळणीची आवश्यकता असेल अशा ठिकाणी तशा तऱ्हेचा उपाय सुचविलेला आहे. लेखकाकडे काही तक्रारी अशा आल्या की, एखादी बाई येते व म्हणते, मला नऊ महीने झालेले आहेत. मी खरोखरच गरोदर आहे किंवा काय ? त्यावेळी मी हसून म्हणत असे. मी कोणी डॉक्टर नाही तुम्ही डॉक्टरांना विचारा तुमच्या प्रश्नाचे उत्तर डॉक्टर सांगतील. एवढे असले तरी त्या बायका हट्ट धरूनच बसायच्या. माझ्याकडे अशीच एक केस आली की; त्या बाईला सुमारे ३ डॉक्टरांनी तपासून असे सांगितले की, तुम्ही गरोदर अहा व ८/९ दिवसातच बाळंत व्हाल. त्या बाईचा हा प्रश्न तिच्या आग्रहास्तव मी पाहून सांगितले की तुम्ही गरोदर नाही. तुम्हास स्पेशालिस्ट कडून सांगण्यात आलेती माहिती साफ चुकीची आहे. दुसरे दिवशी मी त्यांना सांगितलेले अनुभवास आल व त्यांची आणखी खात्री पटली. आणि मी सांगितलेले तंतोतंत खरे ठरले. अशाच तऱ्हेची एक गरोदर बाईची तक्रार माझ्याकडे आली तिचे म्हणणे असे होते की, तिला तिच्या फॅमीली डॉक्टरने त्याच दिवशी तू बाळंत होशिल असे सांगितले. मी तिला म्हटले तुला सांगितलेले चुकीचे आहे. त्या नंतर मी नक्की दिवस काढून दिला. चमत्कार असा की मी दिलेल्या दिवशी ती बाई प्रसूत होऊन मुलगा झाला. मुलगा होणार हे ही पण आधी तिला सांगितले होते.

काही लोक माझ्याकडे चोरी गेलेल्या सामानाचा पत्ता मिळविण्यातांठी येत असतात. त्यावेळी मी त्यांना म्हणत असे की,

नी पोलीस अधिकारी नाही व ते माझे काम ही नव्हे. चोरीचा शोध लावणे, हे काम पोलीस अधिकाऱ्याचे आहे. तरीपण लोकांच्या अत्याग्रहा मुळे चोरींच्या रूपरेखा ठरवून देत असे. ज्यांनी ज्यांनी याचा अनुभव घेतला. ते, ते लोक माझ्याकडे येवून आश्चर्य व्यक्त करित आसतात. मी त्यांना नेहमी म्हणत असे की, हे चमत्कार मी घडवून आणित नाही. माझे काम एवढेच आहे की, तुमच्या करिता आदि—शक्तीशी प्रार्थना, करूणा भाकणे आपण ज्यांवेळी काही एक विशिष्ट पदावर येत असतो व निस्वःर्थ बुद्धीने विभूती भारून देणे, प्रार्थना करणे वगैरे, अंतःकरणाच्या कळवळ्याने करित असतो. त्यावेळी परमेश्वर आपली प्रार्थना ऐकून आपणा करिता बऱ्याच लोकांची दुःखे निवारण करित असतो. व तेच हे चमत्कार मी जेव्हा, जेव्हा लोकांना काही ठरावीक गोष्टी करण्यास सांगतो. त्यावेळी लोकांनी विश्वासपूर्वक तसे केल्यास चमत्कार घडून येतात. यात संदेह नाही आपण आत्मविश्वासाने दिलेल्या विभूतीवर किंवा अन्य काही वस्तूंवर ज्याला खरोखरच आपल्या दुःखातून मुक्तता करून घ्यावयाची असेल तर त्याने दृढ निश्चयाने व श्रद्धेने पार पाडल्यास दुःख निवारणास विलंब लागत नाही. अनेक लोकांना जे जे उपाय निरनिराळ्या वेळी सुचविण्यात आले. त्याची मांडणी लेखकाने फार कौषल्याने केलेली आहे. प्रत्येक उपाय लोकांना सुचविते वेळी तसतसे संदेश घेतलेले आहेत. आज कित्येक दिवसांच्या अनुभवावरून लेखकाने ठोकताळे बनविलेले. आहेत. एवढेच नव्हे तर कुठची व्यक्ती कोणता प्रश्न मनात धरून आलेली आहे. व त्यास काय सुचविले असता यशप्राप्ती होईल हे बिनचूक ठरवून चमत्कारच चमत्कार घडवून आणले या करीता

लेखकास असे वाटते की हे १०१ चमत्कार वाचकानी काळजी पूर्वक वाचावे त्यांच्या व्यथा या चौकटीत कोठे बसत असल्यास स्वतःची मानसिक श क्तिवाढवून विभूती, नामजप अगर प्रार्थनेचा स्वतःवर उपयोग करून घ्यावा परंतु अभ्यास, प्रयत्न, चिकाटी, सदाचार, निर्मलता, सात्विकता, पवित्रता व कळवळा असावयास पाहिजे अशा रितीने सामान्य माणसास अज्ञात आणि स्वप्ना पेक्षाही अद्भूत अशा मनुष्य देहातच सुप्त असणाऱ्या शक्तिचे प्रचंड व अनंत भांडार प्रत्येक व्यक्तित आहे. याचा उपयोग वाचकांनी करून घेतल्यास त्यांनाही चमत्कारांचे दर्शन होवू शकेल व लेखकाच्या कार्यास पुष्टी मिळेल.

चमत्कार हे सर्व देशांमध्ये घडविले जातात व ते घडविण्याच्या रिती व उपकरणे निरनिराळी असतात एखाद्या व्यक्तिने जर आपली अतिंद्रिय शक्ति काही उपायांनी जागृत केली व आपल्या मनाच्या सुप्तावस्थेत असणाऱ्या दिव्य व आश्चर्यकारक शक्ती तशातऱ्हेने जागृत करून लोकांच्या अडचणी दूर केल्या तर मानव जातीवर उपकार होतील. अशा या चमत्कारांची नोंद करून घेण्याचे विचार लेखकाच्या मनात केव्हाच आले नव्हते. परंतु या ग्रंथाचे प्रकाशक जे. विनायक याच्या आग्रहावरून मी वाचकांच्या पुढे हा ग्रंथ ठेवीत आहे. प्रस्तुत विषयाला तेच कारणीभूत झाले. असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. चमत्कार काहीतरी खूळ नसून चैतन्य शक्ति जागृत होवून कशी कायापालट घडवून आणते या बद्दलचे ज्ञान आहे.

५८ ५ श्री घ
३८८६ ५।३।८४

## चमत्कार १ ला

माझ्याकडे दादर येथील एक सायन्स ग्रॅज्युएट नोकरीसंबंधी प्रश्न विचारण्याकरिता आला. हा मनुष्य आला त्यावेळी मी माझ्यासमवेत असलेल्या कुत्र्यांबरोबर रमबाण झालो होतो त्यावेळी असलेले दोन कुत्रे 'ऋषी' व दुसरा 'देवऋषी' यांचेबरोबर मी बोलत होतो. माझी भाषा त्यांना समजते त्यांची भाषा मला समजते असा माझा विश्वास आहे. अशावेळी या दादरच्या मनुष्याने मला प्रश्न विचारला कि मला, योग्य अशी नोकरी मिळेल काय? ती कायम स्वरूपाची असेल काय? व केव्हा मिळेल? या प्रश्नांची उत्तरे मी पत्रिकेद्वारे पहात नव्हतो. एक तर त्यांचेकडे पत्रिका नव्हती. लगेच त्यांच्या प्रश्नांची उत्तरे अतिंद्रिय शक्तद्वारे पहावयास सुरूवात केली. तेवढ्यात माझ्या 'देवऋषी' कुत्र्याने माझ्याकडे पाहून सूचित खुणा केल्या. त्याबरोबर मी माझ्या अतिंद्रिय शक्तिचा उपयोग न करता 'देवऋषी' या कुत्र्याने सूचित केल्याप्रमाणे माझ्याकडे आलेल्या मनुष्यास प्रश्नांची उत्तरे देऊ की काय? येवढेच अतिंद्रिय शक्तिद्वारे विचारले होकार मिळाल्यावर मी त्यांना उत्तर दिली ती अशी, आपल्या इष्टदैवतास ११ वेळ प्रदक्षिणा घाला मात्र इष्टदैवताचे मुख पश्चिमाभिमुख असावयास पाहिजे, असे तीन महिने केल्यास आपली नोकरी बद्दलची इच्छा नक्की सफल होईल. तो मनुष्य मला म्हणाला, माझे इष्टदैवत श्री मारुतीराय आहेत. नंतर मी त्यांना म्हणालो, तुम्ही शनिवारपासून ११ प्रदक्षिणा श्री मारुतीरायांच्या भोवती घालण्यास सुरूवात करा व पश्चिमाभिमुख मारुतीराय पहा. त्यानंतर चमत्कार असा की सुमारे अडीच महिन्यातच त्यांना मनपसंत कायम स्वरूपाची नोकरी एका औषध कंपनीत मिळाली श्री. मारुतीराय त्यांचे भले करो. हिच

सदिच्छा ! या चमत्कारांत विशेष आश्चर्य म्हणजे एक मुक्या प्राण्यानें कसे द्योतक घडवून आणले. तद्‌संबंधांची माहिती वाचकांच्या निदर्शनास आणित आहे. या घटनेतून आपण एवढाच बोध घ्यावयाचा असतो की मुक्या प्राण्यांचे आत्मे केंव्हा केंव्हा मानवास सुचना देत असतात. जो मानव मुक्या प्राण्यांबरोबर प्रेमाच्या भाषेत बोलू शकतो किंवा जाणतो. त्यासच त्याबद्दलचे गौप्य उलगडा करून मिळत असते.

## चमत्कार २ रा

माझे नाव बोरिवली येथील बऱ्याच लोकांच्या कानावर गेल्यामुळे एके दिवशी ३ बायका मला काही निरनिराळे प्रश्न विचारण्या करिता आल्या. त्या बायका मध्ये एका बाईचा प्रश्न मुला संबधीचा होता मुख्य तक्रार अशी होती की, मुलगा उनाडपणा करतो, अभ्यास करित नाही आपल्याला त्रास देतो. अशा एक ना दोन किती तरी तक्रारी मला सांगण्यात आल्या. मी लगेच मुलाची वृत्ती अशी का असावी याबद्दल अतिंद्रिय शक्तीने तपास चालविला. मुलाच्या आईकडे पत्रिका नव्हती. मी संशोधन करीत असता मला असे समजून आले कि, या मुलाचा जन्म घराण्यातील मृत जिवात्म्याचा झालेला आहे. त्याचे आजोबा पुन्हा त्याच घराण्यात जन्मास आलेले आहेत. मी असे सांगत आहे तोच मुलाची आई चटदिशी दचकली व मला म्हणाली-- आपण सांगता ते तंतोतंत बरोबर आहे. माझे सासरे म्हणजे मुलाचे आजोबा मरते समयी माझा हात आपल्या हातात घेऊन म्हणाले होते कि, मी पुन्हा याच घराण्यात जन्मास येणार व तेही तुझ्या पोटी येईन. नंतर मुलगा झाला. ह्या मुलाचे सर्व गुणधर्म बोलणे, चालणे, वागणे सर्व काही आजोबांप्रमाणे होते. हा मुलगा आपल्या वयाच्या ८ व्या वर्षी सुधारेल असे मी त्यांना सांगि-

तेले. तोपर्यंत तुम्ही काहीही केले तरी सुधारणा होणार नाही. लगेच मुलाची आई म्हणाली– आपण म्हणता ते मला खरे वाटते; कारण आपला मुलगा सुधारावा म्हणून मी धार्मिक ग्रंथ वाचले नामजप केला, शंकराच्या पिंडीवर अभिषेक केला, परंतु काहीच वळले नाही. त्यानंतर मी तिला म्हणालो– तुम्हास काहीच करण्याचे प्रयोजन नाही. मुलगा आपोआप वयाच्या ८ व्या वर्षापासून सुधारत जाईल. त्याचे मुख्य कारण असे होते कि, मुलाच्या आजोबांचा स्वभाव वयाच्या ५ व्या ६ व्या वर्षी जसा होता तसा तो नातवामध्ये आला. पूर्नःजन्मामध्ये स्वभाव बरे किंवा वाईट आपण आपल्या बरोबर त्या त्या व्यक्तीचे घेऊन जन्मास येत असतो.

## चमत्कार ३ रा

माझ्याकडे एक रत्नागिरी जिल्ह्यातील जैतापूर या गावची एक शिक्षीका आली त्यावेळी तिने मला नाना प्रश्न विचारले त्या प्रश्नांपैकी एक प्रश्न असा की आम्हा घरातील कुटूंबाना सुमारे १० वर्षे कुठच्याही कार्यात यश का येत नाही. व नंतर तिने माझ्यासमोर पत्रिका पूढे ठेवली मी तिला म्हणालो तुझा प्रश्न पत्रिकेद्वारे सांगता येणार नाही म्हणून मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पहातो. त्या आधारे पहात असता मला असे कळून आले की त्यांच्या घराण्यात मूख्यत्वे करून तिच्या वडिलांनी कुठच्यातरी दैवताचा उपमर्द केला असावा. ही गोष्ट १० वर्षे जूनी असावी मी हि गोष्ट मुलीस सांगितली त्यावेळी तिच्या चटकन ध्यानात आले की, आपले वडिल दत्तगुरूचे उपासक होते व वर्षातून एक वेळ तरी गुरूसप्ताहाचे पारायण करित असत. नंतर ती म्हणाली आमचे कडे एक धार्मिक भोजनाचा कार्यक्रम होत असता भगवीवस्त्रे परिधान केलेला एक गृहस्थ मध्यम वयाचा मला

भोजन वाढा असे सांगू लागला परंतु आमचे घरातील मंडळींनी त्यास हाकलून लावले. त्या दिवसा पासून मात्र आमची परिस्थिती ही अशी झाली. हे मला नक्की माहीत आहे. त्यापुढे ती मला विचारू लागली की परिस्थिती सुधारण्यास यावर काय बरे तोडगा आहे. मी हा प्रश्न माझ्या पद्धती प्रमाणे पाहिला व तिला म्हटले. तुम्ही सात ब्राह्मणास जेवावयास वाढा व दत्तगुरूस शरण जा म्हणजे सर्व काही व्यवस्थित व पूर्ववत होईल. या मंडळींने माझ्या सांगण्या वरून ही गोष्ट लगेच अंमलात आणली व त्यामुळे त्यांची परिस्थिती सुधारू लागली व त्यांना नंतर त्याप्रमाणे दृष्टांतही झाला ही माहीती काही दिवसांची त्या मुलीने मला त्यांच्या नातेवाईका करवी कळविली.

## चमत्कार ४ था

माझ्याकडे एक गृहस्थ आले. काही वर्षांपूर्वी त्यांची दोन मुले अपघातात बळी पडली होती या संबधीचे काही प्रश्न मुलांच्या वडिलांनी मला केले ते असे. मुलांच्या कुंडलीत कोठेही मुलांना अपघात योग होता असे तज्ञ ज्योतिषांनी सांगितले नव्हते तर हे अपघात कसे बरे घडले ! मी लगेच त्यांना म्हणालो. जेव्हा घराण्यातील मुलांच्या कुंडलीत हे योग स्पष्टपणे दिसून येत असतात त्यावेळी आईवडिलांच्या आप्तेष्टांच्या कुंडलीत अशातऱ्हेचे योग असण्याचा संभव असतो अशा कुंडल्या बघतेवेळी चंद्र कुठल्या घरात आहे व तो ग्रह काय दर्शवितो त्याचे परिपूर्ण ज्ञान करून घ्यावयास हवे. तरच अपघाता-संबधी सांगता येणे शक्य आहे. त्यानंतर मी त्यांना म्हणालो, अपघा-तात मरण पावलेली मुले तुमच्या घराण्यात पुन्हा जन्मास यावयासच पाहिजेत व त्यांचे गुणधर्म आवडी निवडी बोलणे चालणे सर्व काही तसे असावयासच पाहिजे. ते मला म्हणाले आपण म्हणता ते अगदी

बरोबर आहे अद्याप पावेतो मला असे भविष्य कोणीच सांगितले नव्हते अशा तऱ्हेचे चमत्कार वारंवार होत असतात. व ते लक्षपूर्वक ज्ञानचक्षू उघडे ठेवून बघावे लागतात.

## चमत्कार ५ वा

महानगरपालिकेच्या महापौर पदाच्या १९७३ सालच्या निवडणूकीत कोण निवडूण येणार याबद्दल काही लोक विचारण्याकरिता आले याबद्दलची माहीती हे लोक ५ते१० मिनीटाच्या फरकाने विचारीत होते. शेवट पर्यंत त्यांना असे कळेना की नक्की कोण निवडून येणार त्यापैकी काही लोक टेलिफोनवरून बातम्या घेत होते व मला नक्की कोण निवडला जाणार म्हणून विचारीत होते. मी माझ्या रहात्या घरातून त्यांना जसजसे सांगत होतो तसतसे तिकडे घटना घडत होत्या. मते देणाऱ्या उमेदवारांची मानसिक घटना कसकशा बदलत होत्या त्याची मजेदार माहिती मी घर बसल्या त्यांना सांगत होतो. सरते शेवटी निकालाच्या पूर्वी अर्धातास सध्या निवडून आलेल्या महापौरांचे नाव सांगितले.

## चमत्कार ६ वा

अशाच एका प्रसंगी विधानसभेच्या नितडणुकीच्यावेळी एका व्यक्तिबद्दल विचाण्यात आले. ते निवडून येतील की नाही. याबद्दलचे भविष्य मी वर्तविले होते. हा प्रश्न त्यांनी पुष्कळ ज्योतिषांना विचारला होता. त्यांचे भविष्य निवडणुकीमध्ये यश मिळेल किंवा नाही हे वर्तविण्याकरता त्यांची कुंडली, त्यांची प्रश्नकुंडली वगैरे आधारे ज्योतिषांनी वर्तविले होते. या व्यक्तिकडून मला प्रश्न विचारण्यात आला त्यावेळी मी त्यांना अतिंद्रिय शक्तिद्वारे चाचणी करून कळविले कि तुम्हास

यश मिळेल, परंतु अनेक अडचणी येतील व पुष्कळ मेहनत करावी लागेल व शेवटच्या घटकेपर्यंत यश मिळते की न मिळते असे वाटेल परंतु माझे अंतरमन मला असे सांगत आहे की यशाची माळ तुमच्याच गळ्यात पडेल. चमत्कार असा की मी जसजसे त्यांना सांगितले तसाच प्रकार घडत गेला व शेवटी यशस्वी झाले. अशा तऱ्हेच्या प्रश्नांनी भविष्ये कथन करीत असता मी दुसऱ्या कुठल्याही अन्य पत्रिकेची वगैरे मदत घेत नसतो. आपणास ज्यावेळी दिव्यदृष्टी प्राप्त होत असते त्यावेळी भविष्य काळातील घटना अतिंद्रिय मनाला जाणीव होते.

## चमत्कार ७ वा

मी सध्या जेथे बोरिवली येथे रहात आहे, तिकडील बहुतेक सर्व लोकांस माहीत आहे की मी विभूतीद्वारे रोगांवर व पिशाच्च बाधे-वर उपाय करीत असतो. एके दिवशी एक वयस्क बाई माझ्याकडे एका दुखण्यासंबंधी विचारण्यास आली. या मुलास सायकलीचा अपघात होऊन मुका मार लागला होता व मेंदूसही इजा झाली होती. मेंदूस इजा झाल्यामुळे हा मुलगा विचित्रच वागत होता व त्याचे बोलणे-चालणे शुद्धीत नव्हते. मी त्या मुलाकडून प्रथमतः अप-घाताची जागा विचारून घेतली. त्याचे कारण काही जागा अशा असतात की त्या ठिकाणी एकसारखे अपघात होत असतात. त्यानंतर मी त्यास विभूती भारून दिली व डोक्यास चोळावयास सांगितली. चमत्कार असा की दुसऱ्या दिवशी मुलगा शुद्धीवर आला. त्याचा ताप गेला. मेंदूच्या ठिकाणी दुखत होते, ते बंद झाले. सर्व तक्रारी पार नाहीशा झाल्या. विभूतीमध्ये प्रखर आत्मशक्ति तेज तयार झाल्यास विभूतीचा उपयोग नक्कीच औषधासारखा होतो. नाहीपेक्षा गुण यावयास पाहिजे तेवढा येत नाही. याकरिता विभूती देणारा

मनुष्य सामर्थ्यवान असावा लागतो. नवनाथ अशा तऱ्हेच्या विभूती देवून लोकांची दुखणी दूर करीत असत.

### चमत्कार ८ वा

घरात वारंवार चोऱ्या व्हावयास लागल्या त्याबद्दल एका कुटुंबास काहीच उलगडा होईना म्हणून ती मंडळी माझ्याकडे विचारपूस करण्यास माझ्याकडे येण्यापूर्वी ही काहीतरी भुताटकी नाही ना? असेही त्यांना वाटत होते. त्याचप्रमाणे काही वयस्थ माणसांवरही त्यांचा संशय होता. ही मंडळी माझ्याकडे आली त्यावेळी त्यांच्या घरात चोऱ्या कसकशा झाल्या वगैरे बद्दलचा पूर्व इतिहास विचारून घेतला व मी असे ठरविले, ह्या चोऱ्या भुताटकीने होत नाहीत तर कोणीतरी घरातलाच मनुष्य आहे. या प्रश्नांची विचारपूस मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिली व त्यांना म्हटले, तुमची एक अशा तऱ्हेची वस्तू अद्याप पावेतो तुमच्या कामवाली बाईकडे आहे. तरी तिची झडती घेतल्यास नक्की मिळू शकेल. त्याप्रमाणे या लोकांनी त्या बाईवर नजर ठेवली व त्याच दिवशी संध्याकाळी ती बाई तिच्या एका नातेवाईकामार्फत चोरलेली वस्तू देत असता पकडण्यात आली व त्यामुळे नक्की चोर मिळाला. त्या बाईला कामावरून नंतर दूर करण्यात आले. परदेशात इंग्लंड, अमेरिका, जर्मनी वगैरे राष्ट्रात ज्या वेळी पोलिसांना गुन्हेगार मिळत नाही. त्यावेळी अशा गूढक्रिया जाणणाऱ्या मनुष्याचा गुन्हे शोधून काढण्याकरिता उपयोग करीत असतात.

### चमत्कार ९ वा

लेखकाकडे एक बोरिवली येथील बाई घरकामास होती. माझ्याकडे पुष्कळ लोक निरनिराळे विचारावयास येतात. हे ती पहात होती.

माझ्याकडे येणाऱ्या लोकांपैकी नानाविध क्षेत्रातले लोक विचारावयास येत असतात. चोरीचा तपास, कायद्याचा सल्ला व इतर भविष्य माझ्याकडे कामास असलेल्या बाईची सोन्याची वस्तू व रुपये पाच मिळेनात. कोणीतरी चोरले असावेत असा तिला दाट संशय येऊ लागला, म्हणून ती लगेच एका ब्राह्मण ज्योतिषाकडे गेली. तो ज्योतिषी त्या बाईला म्हणाले, वस्तू चोरीस गेली आहे. ती पुन्हा मिळणार नाही. ज्यावेळी तिने हा प्रश्न मला विचारला, त्यावेळी मी तिला म्हणालो, वस्तू घरातच आहे. बाहेर गेलेली नाही व कोणी चोरलेली नाही. घरातीलच मंडळींनी कोणीतरी दुसऱ्या जागेवर ठेवलेली आहे व तीन दिवसांच्या आत सापडेल दुसऱ्या दिवशीच संध्याकाळी वस्तू व रुपये पाच घरातच सापडले व तिला आनंद झाला. लगेच ती माझ्याकडे आली व मला सर्व वृत्तांत सांगितला ज्या वेळी प्रश्न कुंडलीमध्ये अशा उत्तरांचा थांग लागत नाही. त्यावेळी दिव्यदृष्टीने बसावे लागते.

## चमत्कार १० वा

एक आश्चर्यकारक विचारणा माझ्याकडे एका बाईने केली. हा प्रश्न मला विचारण्यात आला. त्यावेळी तिच्या बरोबर दोन वयस्कर बायकाही होत्या. प्रश्न विचारणाऱ्या बाईस सुमारे नऊ महिने होऊन गरोदरपणाच्या सर्व भावना होत होत्या. हे नक्की काय असावे म्हणून ह्या बाईने मॅटरनीटी हॉस्पीटलमध्ये निरनिराळ्या तीन ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरकडून तपासणी करून घेतली. तिच्याकडे केस रिपोर्ट पेपर्सही होते तिने मला प्रश्न विचारला की, मी खरोखरच गरोदर आहे की काय ? हा तिचा प्रश्न म्हणजे डॉक्टर व ज्योतिषी यांच्यामधील एक झगडाच होता. हा प्रश्न मी फार काळजीपूर्वक अतिंद्रिय शक्तिद्वारे

तपासून पाहिला व बाईला म्हटले, आपण गरोदर नाहीत. डॉक्टर्सने ठरविलेले अनुमान चुकीचे आहे. याकरिता तुम्ही एक्स-रे फोटो काढून घ्या. एवढेच नव्हे तर तुम्हास या दोन दिवसामध्ये असे करून येईल की, तुमची मासिक पाळी चटदिशी होऊन जाईल. मी तिला म्हटले होते त्याप्रमाणे झाले. आणखी खात्री व्हावी म्हणून एक्स-रे फोटोही काढून घेतला. त्यानंतर ती बाई ज्या डॉक्टर्सने तिला तपासले होते त्यांना जाऊन भेटली. ते डॉक्टर्स त्या बाईना एवढेच म्हणाले की, असे केव्हा केव्हा होते. आम्हास काहीच कळत नाही. अशावेळी दिव्यदृष्टीने पहाण्याची फार गरज असते व असे चमत्कार तो निदर्शनाला आणू शकतो.

## चमत्कार ११ वा

काँही काही लोकांना सुचक स्वप्ने पडत असतात. स्वप्ने म्हटली म्हणजे शुभही पण असू शकतात. व अशुभही पण एखाद्या व्यक्तीने गुंतागुंतीचे स्वप्न आपणास कथन केल्यानंतर त्यांचा अर्थ कसा लावावयाचा व त्याबद्दलची सुचकता कशी जाणून घ्यावयाची, असा पेच प्रसंग निर्माण होतो. असे एक स्वप्न सांगण्याकरिता माझ्याकडे एक बाई आली. स्वप्नात साप दिसला, प्राणी दिसले एक नग्न संन्यासी, मांजर, नदीत वाहून कपडे जात आहेत असे दिसले. अशा या स्वप्नाचा अर्थ मी अतिंद्रिय शक्तिद्वारेच पहात असतो प्रथमतः स्वप्न खरे की खोटे ते पहातो कारण काही स्वप्ने कफ, वात, पित्त या त्रिदोषाच्या कमी जास्त तिव्रते मुळे पडत असतात हे स्वप्न मात्र तसे नव्हते मी त्या बाईस स्वप्नाचा अर्थ सांगितला तो असा, तुमच्या करात कलह माजून पती 'पत्निचा वियोग होईल व त्यांनंतर तुझा काळ फार हलाखीचा येईल. त्यानंतर पति पत्नीचे मिलन झाले

तरी कोणाएकास तरी कायमचा फाटा द्यावा लागेल स्वप्नाचा अर्थ सांगून महिना होतो न होतो तोच तसे घडल व त्यांच्या युती मध्ये कायमचा खंड पडला. या हकिकतीस सुमारे दिडवर्ष झाले.

## चमत्कार १२ वा

माझ्या एका स्नेह्यांपैकी एक गृहस्थ माझेकडे आले. त्यांची पत्नी परदेशांत आहे आपल्या पत्नीचे बरेच दिवसात पत्र नही. तेव्हा हा काय प्रकार असावा असे विचारण्यात आले तत्पूर्वी त्यांनी सांगीतलेली हकीकत देत आहे. काही दूष्ट माणसे या जोडप्या विरूद्ध नेहमी करीत एवढेच नव्हे तर त्यांचे पट्नू नये म्हणून जारण मारण सारखे प्रयोग चालू होते. त्यांची पत्नी जेथे परदेशात होती. तिकडेही त्यांनी काही लोकांच्या मार्फत तिला सुख लागू नये म्हणून प्रयत्न केले होते, मी ज्यावेळी त्यांचा प्रश्न ध्यानस्थ बसून पाहिला त्यावेळी प्रश्नांची उत्तरे दिली ती अशी, आपली पत्नी खुशाल आहे. पण तीचे मन फार उद्विग्न झाले असून तेथे तिला पाहिजे तसे मानसिक सुख नाही. तुम्हास आठ दिवसात तिच्याकडून पत्र येत आहे. पत्रातील मजकूर मी सांगतो, अशाथराचा आहे. चमत्कार असा की आठ दिवसांतच त्यांना पत्र मिळून इतर मजकुराबरोबरच मी सांगितलेला मजकूर तीने लिहिला होता. तिचे पतिराज माझेकडे आले व त्यांनी ते पत्र मला दाखविले व स्वाभाविकच आनंदीत झाले.

## चमत्कार १३ वा

मुंबई उपनगरातील एक बाई तिच्या नातेवाईक मंडळींना बरोबर घेऊन माझेकडे बोरिवलीस आली. तिचा प्रश्न फार नाजुक होता. सुमारे १०–१२ वर्षे नवऱ्यावरोबर पटत नव्हते. नेहमी काही

ना काही कारणावरून भांडण व्हावयाचे. या भांडणाचा विकोप असा झाला की नवऱ्याने घटस्पोटाची तयारी दाखविली व मुलाबाळांसह बायकोस घराबाहेर हाकलविली. नंतर ती बाई आपल्या बंधूकडे येऊन राहिली. अशासंबंधीचे प्रश्न लेखक फार कौशल्याने सोडवितो असे बोरिवली येथे व आजुबाजूचे लोकांस माहिती झाली. बाईने मला सर्व हकिकत कथन केल्यावर मी अतिंद्रिय शक्तिधारे प्रश्न पाहून सांगितले, भिवू नका, तुमचे मिलन होईल. त्याकरिता तुम्हास एक प्रार्थना लिहून देतो. त्यामुळे बाईस व इतर मंडळींस आनंद होऊन त्या माझ्याकडे कौतुकाने पाहू लागल्या. मी त्या बाईना एक प्रार्थना लिहून दिली व ती गुरुवारपासून म्हणण्यास सांगितले. ही प्रार्थना मी दत्तकृपेपासून मिळविली होती. या प्रार्थनेचा इतका उपयोग झाता की तिच्या नवऱ्याचे पत्र पाचसहा दिवसातच ती जेथे आश्रयासाठी आली होती तेथे आले. नवऱ्यास पत्ता माहीत होता. ही बाई माझे-कडे आली व त्यानंतर मी तिला नवऱ्याकडे जाण्यास सांगितले व सूचना दिली की कोणत्याही परिस्थितीत प्रार्थना बंद ठेवायची नाही. दोघांचा इतका मिलाप झाला की ते कुटुंब आता सुखासमाधानात नांदत आहे. त्यानंतर उभयता पतिपत्नी माझेकडे येऊन गेली. इश्वर त्यांना सुखी ठेवो.

## चमत्कार १४ वा

माझ्याकडे दादर येथील एक मनुष्य हर्निया रोगासंबंधी विचार-पूस करण्यास आला. हा मनुष्य अतिशय भाविक व सात्वीक आहे. संतसाधूबद्दल दृढ प्रेम आहे. त्यांनी हर्नियावर ॲलोपथिक, होमिओ-पथिक, आयूर्वेदीक वगैरे सर्व पद्धतीतून उपचार केले होते. तो माझेकडे आला त्यावेळी त्यानी मला प्रश्न केला की, हर्नियावर

ऑपरेशन करण्याची आवश्यकता आहे, किंवा काय ? की औषधानेच बरा होइल ! अशा प्रश्नामध्ये मी अतिंद्रिय शक्तिधारे सर्व बाजूनी विचार करित असतो. कांही वेळा एखादा रोग बरा होण्यासाठी औषधी योजना व दैविक शक्ति या दोहोंचीही गरज लागते. यांच्या प्रश्नामध्ये असे उत्तर आले की ऑपरेशनची गरज नाही, फक्त विभूतीद्वारे काम होइल. मी त्याना त्याप्रमाणे विभूती भारुन दिली व रोगाच्या जागेवर ते करित असलेला नामजप जपून विभूती लावण्यास सांगितली चमत्कार असा की तीन महिन्यातच हर्निया बरा झाला.

## चमत्कार १५ वा

गोरेगावची एक ब्राम्हण बाई माझेकडे आली. ती बाई श्री दत्तमहाराजांची अतिशय भक्त आहे. तिच्याकडे दत्तगुरुंच्या निर्गुण पादुका आहेत तिचे यजमान असतेवेळी ह्या कुटूंबाचे सर्व व्यवहार ठिक चालले होते. त्यानंतर मात्र परिस्थिती खालावत गेली. ती बाई पूढे म्हणाली की आठवर्षात तर परिस्थिती अतिशय खालावली इतकेच नव्हेतर, तिला व गुरुपादुकाना कायमचे असे स्थान मिळेना. ही आपली इच्छा केंव्हा सफल होइल असे त्यांचे म्हणणे होते. त्यानंतर तिला मी श्री दत्तगुरुंकडे प्रार्थना करुन विभूती दिली. व म्हटले तुम्ही ही विभूती रात्री झोपतेवेळी उशीखाली ठेवा. श्री दत्तगुरु तुम्हास आदेश देतील त्याप्रमाणे करा. त्याप्रमाणे दुसऱ्या रात्रीच तिला सूचना मिळाली की लवकरच तुला योग्य स्थान मिळेल. त्याप्रमाणे वारेही वाहू लागले आहेत. ही सर्व हकिकत मला त्या बाईने कथन केली तशी देत आहे.

## चमत्कार १६ वा

माझ्याकडे लालबाग, परळ भागातील एक ब्राह्मण मनुष्य करणीमुळे कंटाळून गेलेला असा भेटावयास आला. मी नवशक्ति मध्ये ' पिशाच्च बाधा व करणी ' या मथळयाखाली प्रसिद्ध केलेले पत्र वाचून माझ्याकडे तो इसम आला होता. हा गृहस्थ विद्वान सुशिक्षित असा ब्राम्हण आहे. तत्वज्ञान व धार्मिक विषयावर पुष्कळसे वाचन केले आहे. त्याचप्रमाणे फळ–ज्योतिष्याची त्यास आवड आहे. त्याची मुख्य तक्रार अशी होती की, एका बाईने त्याच्यावर करणी, कोणासही आजतागायत सुमारे १२ वर्षे परतविण्यास आली नाही त्याकरिता या गृहस्थाने मांत्रिक, भगत, ज्योतिषी वगैरे बहुतेक सर्व लोकांना भेटून व बंदोबस्त करून सुद्धा काहीच होऊ शकले नाही म्हणून हताश झाले होते. अशा ह्या परिस्थितीत ते माझ्याकडे बोरिवली येथे आले. मी त्यांची सर्व हकीकत ऐकून घेतली व त्यांना म्हटले, ' तुम्हास करणी–मुक्त व्हावयास निदान ६ महीने तरी लागतील व तेही पण आपण श्रद्धायुक्त अंतःकरणाने व विश्वासाने मी दिलेली प्रार्थना जेवढा वेळ म्हणता येईल, तेवढा वेळ म्हणावयास तयार असाल तर ? ' या गृहस्थाच्या घरात नाना वस्तू येऊन पडत असत. एवढेच नव्हे तर ! घरात पाणी येऊन कुठून पडत असे तेही त्यांना समजेना. मी प्रार्थना तयार करून त्यांना दिली. त्यानंतर त्याने म्हणावयास सुरवात केली व सुमारे चार महिन्यानंतर त्यांचे पत्र मला आले की, आम्ही सर्वजण करणीतून मुक्त झालो. धन्यवाद ! आपले आभारी आहोत. ज्यावेळी एखादी करणी फार जुनी होते त्यावेळी ती प्रत्येकाच्या हाडीमासी खेळल्यामुळे दूर करणे कठीण जाते. तरी पण विश्वासाने प्रार्थना केल्यास असा हा चमत्कार घडून येतो.

## चमत्कार १७ वा

फोर्ट ऑफिसमधला काम करणारा एक अधिकारी माझ्याकडे आला. आपला मुलगी आज कित्येक दिवस शारीरीक पीडेने आजारी आहे, असे सांगू लागला. नाकातून रक्त येणे व मधून मधून अंगात व रे खेळणे, अशी तक्रार होती. त्यांनी आपल्या मुलीस बहुतेक सर्व डॉक्टर, वैद्यांना दाखविली होती. त्याचप्रमाणे ज्यांच्या अंगावर देवीचे वारे येते अशानाही तिच्याबद्दल विचारले होते. शेवटी त्यांना असे आढळून आले की, कुठच्याच उपाय योजनेने हे हटत नाही. आता काय कावे ? त्यानंतर ते माझ्याकडे आल्यावरही त्यांचा प्रश्न मी प हयणस सुरवात केली. त्याची उत्तरे अशी आली की, मुलीने पाच मंगळवार करावे व मी दिलेली विभूति पाण्याबरोबर घ्यावी. त्याप्रमाणे सुरवात केली. आश्चर्य असे की, पाच मंगळवारातच नाकातील रक्त थांबले गेले. अंगात खेळत होते ते बंद झाले. मुलीची बुद्धी स्थिर झाली, शारीरिक पीडा दूर झाल्याने आनंदाने वजन वाढू लागले य तिच्या सर्व तक्रारी दूर झाल्या. योग्य वेळ येताच योग्य गोष्टी होत असतात. तोपर्यंत भोग भोगणे प्राप्त होते. आजतागायत त्या मुलीस बरे वाटत आहे. कोणतीच तक्रार नाही.

## चमत्कार १८ वा

माझ्याकडे दादर येथील मुलगा नोकरी कुठे मिळेल ? अमक्या अमक्या ठिकाणी जमेल की नाही ? वगैरे विचारावयास येत असे. तो मुलगा शिरडी साईबाबांचा भक्त होता. त्यास मधून मधून शिरडी साईबाबांचे दृष्टांत होत असत. या मुलाने मला नोकरी संबंधी तीन प्रश्न विचारले. त्या तिन्ही प्रश्नांची उत्तरे मी अशी दिली. एका ठिकाणच्या नोकरीमध्ये तुम्ही विसंबून राहू नका कारण त्यांनी

तुम्हास सर्व काही खोटे सांगितले आहे व नोकरी संबंधी काहीच प्रयत्न केलेले नाहीत. दुसऱ्या मनुष्याने मात्र त्या कंपनीत प्रयत्न केलेले आहेत. परंतु यश येणार नाही. तिसरीकडे तुम्हास हमखास यश येऊन आठ दिवसाच्या आत तुम्हास नोकरी मिळेल. माझ्याकडे हा मुलगा कुठच्यातरी मंगळवारी आला होता. दुसऱ्या मंगवारी त्यास मी सांगितलेल्या कंपनीत नोकरी मिळाली. त्याच्यावर श्री साईबाबा शिरडी यांनी कृपा केली, असे मी समजतो. एक नोकरी सुटली की लगेच त्यास दुसरी नोकरी मिळतअसे. मी त्यास योग्य मार्गदर्शन केले व श्री मारुती प्रीत्यर्थ एक जप दिला व हा चमत्कार घडवून आणला.

## चमत्कार १९ वा

माझ्याकडे एक बाई आपल्या मुलासंबंधी विचारावयास आली. ही बाई माझेकडे येण्यापूर्वी पुष्कळ लोकांकडे जाऊन आली होती. आपला गेलेला मुलगा पुन्हा केव्हा येईल ? असा तिचा प्रश्न होता. यापूर्वी काही जाणकार लोकांनी तो ठराविक मुदतीत येईल असे सांगितले होते. मी तिला म्हटले होते, मुलगा येण्यास फार उशीर लागेल, पण येईल. मध्यंतरीच्या काळात मुलगा कोठे आहे ? याबद्दल काहीच कळेना म्हणून ती माझ्याकडे वारंवार येऊन विचारपूस करीत असे. मी तिला म्हटले, तुला मी एक प्रार्थना लिहून देतो व त्यामुळे तुला मुलगा कोठे आहे ते नक्की समजून येईल. प्रार्थना दिल्यापासून अवघ्या चारपाच दिवसांतच माहिती मिळाली. त्या बाईचा मुलगा पूणे येथे खुशाल आहे. त्या बाईला हे ऐकून खरोखरच आश्चर्य वाटले.

## चमत्कार २० वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक सुशिक्षित इसम आला. त्याचा प्रश्न असा होता की, आपल्या घरात कोणालाही समाधान व

मानसिक सुख का लाभत नाही ? त्यांच्या या प्रश्नाबद्दल मी त्यांना उलटसुलट पुष्कळ प्रश्न विचारले व त्यांचे घर चांगले लाभत नाही की काय ? वगैरेही पण पाहिले. त्यानंतर मला अतिंद्रिय शक्तिद्वारे असे उत्तर मिळाले की, त्यांच्या घरात एक दुष्ट अदृष्य आत्मा त्यांना सुख-समाधान व मानसिक सौख्य लाभू देत नसे. त्यानंतर त्यांना मी विभूति भारून देऊन सांगितले की, त्या आत्माची काय इच्छा असेल ते पहावयास मिळेल. त्यानंतर त्यांना दृष्टांत झाला व ते मला पुन्हा भेटले, त्यावेळी त्यांनी तो दृष्टांत मला कथन केला. त्यावर मी तावडतीव त्यांना निरनिराळे तोडगे सुचविले व त्या क्लेशांतून मुक्त केले.

## चमत्कार २१ वा

माझे नाव ऐकून एक दैवज्ञ ज्ञातीतील बाई दुसऱ्या एका शेजारील बाईस घेऊन माझ्याकडे आली. ह्या बाईच्या घरातील एक इसम हॉस्पिटलमध्ये फार आजारी होता. डॉक्टरांनी सर्व आशा सोडल्या होत्या. कुठच्याही घटकेस मरण पावेल अशा परिस्थितील श्वास काढीत होता. ज्या ज्या वेळी आजारीपणाबद्दलचे प्रश्न लोक मला विचारीत असतात त्यावेळी मी प्रथमतः आदिशक्तिला विचारीत असतो की, हा पेशंट जगेल की मरेल. हे आजमावून मी उपाय सांगत असतो. या बाईचा हा प्रश्न मी प्रथमतः अतिंद्रियशक्तिद्वारे असा पाहिला व बाईस म्हटले, भिऊ नका ! पेशंट दगावणे शक्य नाही. मी तुम्हास विभूति भारून देतो. ती पेशंटच्या अंगास लावा व पाण्याबरोबर थोडी पोटांत द्या. चमत्कार असा की, तीन चार तासांतच पेशंट स्वतः होऊन उठला व बसला व म्हणाला की, मला बरे वाटते. मला घरी घेऊन चला व दोन दिवसातच त्यास घरी आणले. त्यानंतर

ग्रं. क्र. १५८८८
२५
बाजे वा.

पेशंटमध्ये बरीच सुधारणा झाली व आज तारखेस हयात आहे. ही हकीकत त्या बाईने येऊन मला सांगितली. जशीच्या तशीच मी इकडे देत आहे.

## चमत्कार २२ वा

माझी किर्ती बऱ्याच लोकांच्या कानावर गेली होती. हे ऐकून बँकेच्या सोसायटीमध्ये राहणारी एक बाई माझ्याकडे आली. तिचे प्रश्न असे होते की, आमच्या घरात सुखसमाधान लाभत नाही. कितीही पैसा मिळविला तरी नेहमीच प्रमाण व्यस्त. यामुळे ती मला विचारू लागली की, हे असे होण्याचे कारण आमच्या मागे काही ग्रहपीडा आहे किंवा काय ? माझ्या पद्धतीप्रमाणे प्रश्नांची विचारणा चालली असता मला असा आदेश आला की, या घराण्यांत एक मृत मनुष्य ब्रम्हसमंध होऊन तो यांना त्रास देत आहे. मला हे उत्तर मिळाल्यावर मी त्या बाईस चटदिशी विचारले की, तुमच्या घराण्यात असे काही आहे किंवा काय ? तिने होकार दिला. त्यानंतर मी त्यांना उपाय सुचविले व आश्चर्य असे की, उपाययोजना चालू असता त्यांना सुख समाधान लाभू लगले. ब्रम्हसमंध त्याचे भले करो.

## चमत्कार २३ वा

माझ्याकडे एका बाईच्या ओळखीने दुसरी एक बाई आली. तिचे सांगण्यावरून ती सुमारे नऊ महिन्याची गरोदर होती. ही बाई माझ्याकडे येण्याचे पूर्वी सुमारे तीन चार मॅटर्निटी तज्ञ डॉक्टरकडे जाऊन आली होती. त्या सर्वांचा दावा असा होता की, ही बाई नक्की गरोदर आहे. तिच्या पोटामध्ये खात्रीने टयूमर वगैरे काही नाही. एवढेच नव्हे तर बालकाला इतर अवयव आहेत, असेही त्या बाईस व

इतर आजूबाजूच्या बायांना याबद्दलचा काहीच उलगडा होईना. म्हणून हा प्रश्न माझ्याकडे घेऊन आल्या व उलगडा करून घ्यावा म्हणून मला प्रश्न विचारण्यात आला. प्रश्नाचे उत्तर मी अतिंद्रियशक्ति-द्वारे दिले व मला प्रश्नाचे उत्तर असे सापडले की, बाई नक्की गरोदर नाही. मी माझ्या शक्तिद्वारे हे सांगण्याचे धाडस केले व श्री दत्तगुरुला नमन करून विभूती भारून दिली व सांगितले की, याचा उलगडा तीन दिवसात होईल. ही बाई दुसऱ्याच दिवशी बाहेरची झाली व असे कळून आले की, तिच्या पोटात गर्भ नव्हता. ही बाई माझ्याकडे आली त्यावेळी मात्र तिच्यावर गरोदरपणाची सर्व लक्षणे होती. असे हे अनुभव म्हणजे खरोखरच चमत्कार आहेत. चमत्काराशिवाय नमस्कार नाही असे म्हणतात ते खोटे नाही.

## चमत्कार २४ वा

माझ्याकडे एक गृहस्थ त्यांच्या घरात चोरी झाल्याबद्दलचे विचारण्यास आला. अशा ह्या तक्रारीमध्ये माझ्या पद्धतीप्रमाणे मी प्रत्येक गोष्टीचा पूर्व इतिहास मिळवीत असतो. या प्रश्नाबद्दलचा तपशीलवार इतिहास मिळविल्यानंतर मी त्यांना म्हटले की, आपल्या ओळखीच्या कोणीतरी इसमाने ही चोरी केली आहे. ह्या चोरीचा मागमूस लागून आपली वस्तू परत मिळेल. अद्याप पावेतो चोरीस गेलेली वस्तू त्या इसमापाशी आहे. आता प्रश्न एवढाच होता की, त्याजकडून ही वस्तू परत कशी येईल? त्याकरिता मी त्यास विभूती भारून दिली व म्हटले की, ज्याने वस्तू नेली असेल, ती माझी मला परत करावी व करीलच यात संशय नाही. एवढा शब्दप्रयोग विभूती-मध्ये तयार करावयास सांगितला. त्यानंतर तीन दिवसांच्या आतच श्री दत्तगुरु चोराच्या स्वप्नात जाऊन दत्तगुरुंनी ती वस्तू वस्तूच्या

मालकास देण्यास सांगितले व ताकीदही दिली. चोराने ती वस्तू आणून त्यांच्या स्वाधीन केली व तो खजील झाला. यामध्ये विभूती काय चमत्कार करू शकते अशा तऱ्हेचा हा एक अनुभव आहे.

## चमत्कार २५ वा

माझ्याकडील एक बोरिवली पूर्व येथे रहाणारा पोलीस खात्यातील रिटायर्ड जमादार आला. त्यांचा मुलगा घरातून पळून गेला होता. त्यांना मुलासंबंधीचा इतिहास विचारते वेळी असे कळून आले की, त्यास तसे कुठचेच व्यंग नव्हते. अशा ह्या परिस्थितीमध्ये मुलगा पळून का गेला ? हा प्रश्न तर्कशास्त्रापुढे उभा राहतो. माझ्याकडे येण्यापूर्वी हा पोलीस जमादार आणखी दोघा-तिघांकडे गेलेला होता. परंतु मुलासंबंधी त्यांनी सांगितलेले भविष्य त्याला पटले नव्हते. मी त्यांना म्हणालो की, आपण आपल्या कुलस्वामीनीस श्री-फल टेवा व त्यावर मी देतो ती विभूति शिंपडवा व दिवसांतून जेवढा वेळ प्रार्थना करता येईल तेवढा वेळ ' आमचा मुलगा येऊ द्या, त्याचे विचार पालट होऊ द्या '— असे तीन-चार दिवस म्हणत जा. त्याचप्रमाणे मी देत असलेली थोडी विभूती तो वापरीत असलेल्या शर्टामध्ये, कोटामध्ये किंवा पँटमध्ये ठेवून द्या. आश्चर्य असे की, तो मुलगा अठ्ठेचाळीस तासात संध्याकाळच्या वेळी परत घरी आला. आइवडिलांस व भावांस फार फार आश्चर्य वाटले. श्रद्धा व विश्वास काम काम करू शकते, याबद्दलचा हा अनुभव आला.

## चमत्कार २६ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक इसम एका ओळखीच्या बाईस बरोबर घेऊन आला. त्याचे सोबत असलेली बाई माझेकडे

वारंवार येते. तिला यापूर्वी मी तिच्या व दुसऱ्यांच्या बाबतीत सांगितलेले अनुभवास आले होते. तिच्याबरोबर असलेल्या इसमाचा प्रश्न असा होता की, आपला बंधू काल घरातून ऑफिसात जाण्यास निघाला, तो परत घरी आला नाही. ऑफिसात टेलिफोन करून विचारण्यात आले. त्यावेळी समजले की, आज ते ऑफिसातच आले नाहीत. तेव्हा ते घाबरून गेले. त्याचप्रमाणे त्यांनी पोलीस स्टेशनवर कळवून ठेवले होते. त्यांचा प्रश्न ज्यावेळी मी पाहिला त्यावेळी हा इसम खुशाल आहे व कोठेतरी मुंबई उपनगरातच असून कोणीतरी त्याच्यावर मोहिनीचा प्रयोग केलेला आहे, असे म्हटले. त्यांना मी विभूती भारून दिली व म्हटले की, ही विभूती त्या इसमाच्या शर्ट किंवा पँटच्या खिशात ठेवून द्या. चमत्कार असा की, ज्याच्यावर मोहिनीविद्येचा प्रयोग झाला होता तो इसम रात्रौ सुमारे नऊ वाजता घरी आला. प्रयोग करणाऱ्या मंडळीने त्यास लुबाडले होते. त्यानंतर त्यास सुमारे सात-आठ दिवस त्याच्यावर मंत्रावलेल्या विभूतीचे प्रयोग करून त्यास ताळ्यावर आणला.

## चमत्कार २७ वा

माझ्याकडे एक मुंबई उपनगरातील ओळखीची बाई आली. तिचा प्रश्न असा होता की, एक सोन्याचा दागिना कोणीतरी चोरलेला आहे. मी त्या बाईस मागील पुढील सर्व प्रश्न विचारले व म्हटले की, हा तुझा दागिना बाहेर गेलेला नाही, घरातच आहे. इतकेच नव्हे तर तुझी चेष्टा करण्याकरिता हा दागिना लपवून ठेवला आहे. त्यानंतर अचानक एके दिवशी ती आपली ट्रंक साफ करीत असता तिला त्या ट्रंकेत हा दागिना मिळाला. तिला फार आनंद झाला व आश्चर्य वाटले. कारण तिने दागिन्यांची आशा सोडली होती.

तपासाअंती तिला असे कळले की, घरातीलच माणसांनी हा दागिना ट्रंकेत लपवून ठेवला होता.

## चमत्कार २८ वा

मनुष्य प्राण्यास जशी सूचित स्वप्ने पडतात किंवा भास होतात त्याचप्रमाणे मुके प्राणीहीपण केव्हा केव्हा मानवास जागृत करण्याकरिता सूचित चिन्हे तयार करीत असतात. मुक्या प्राण्यांचीही चिन्हे तयार करीत असतात. मुक्या प्राण्यांचीही चिन्हे ओळखणारा एखादा मनुष्य असल्यास तो तंतोतंत पुढे होणाऱ्या घटना सांगू शकतो. याबाबतीत माझा अभ्यास फार दांडगा आहे. हल्ली मी माझे आयुष्य बहुतेक कुत्र्यांसमवेत घालवीत असतो. कुत्र्यांची भाषा आता मला चांगलीच अवगत झालेली आहे. काही दिवसांपूर्वी माझ्यासमवेत असलेले कुत्रे बोरिवली येथील रहात्या घरी एके रात्री दुःचिन्हांची भाषा करू लागली. ही वेळ सुमारे रात्रीची साडेआठ वाजताची होती. कुत्रे ठराविक इशारा देत असता माझ्याकडे असलेला एक मित्र व मुलगा मला विचारातला लागले की, हे कुत्रे असे का ओरडतात ? मी त्यांना लगेच म्हटले की, आतापासून चोवीस तासांच्या आत कुठेतरी पश्चिम दिशेस धोका आहे. त्याचे हे दर्शक आहे. त्याप्रमाणे सकाळी सुमारे साडेआठ वाजता आम्ही राहतो त्या समोरील कारखान्यास अचानक आग लागली. मानवाला जशा सूचना मिळत असतात तशाच मुक्या प्राण्यांनाही, पक्षांनाही मिळत असतात. मानवांनी या गोष्टीचा लक्षपूर्वक अभ्यास केल्यास असे हे चमत्कार त्यांस उलगडतील.

## चमत्कार २९ वा

अशा त-हेची द्योतक माझ्याकडे असलेला कुत्रा एकसारखा करावयास लागला. मला बोरिवली येथील आजुबाजूस राहणारी मंडळी विचारावयास लागली की, हे दुःचिन्ह काय आहे? मी मुक्या प्राण्यांची भाषा जाणतो म्हणूनच पुष्कळ लोकांनी हा प्रश्न विचारला होता. मी त्यांना म्हटले की, अठ्ठेचाळीस तासांत पूर्वेच्या बाजूस कोठेतरी आग लागेल. त्यांना सांगून अठ्ठेचाळीस तास पुरे होतात न होतात तोच आम्ही रहातो त्याच्या पूर्वेस रात्री सुमारे साडेअकरा वाजता आग लागली. वरील व हे उदाहरण मी इकडे देण्याचे मुख्य कारण म्हणजे, मुक्या प्राण्यां करवी जे सूचनार्थ समजत असते. तेच खरे चमत्कार होत.

## चमत्कार ३० वा

मी रहातो त्या ठिकाणी एक नजिकची मुलगी दुपारच्या वेळी काहीतरी विचित्र चाळे करू लागली. म्हणून तिची आई माझ्याकडे धावत आली. तिला मी मुलीसंबंधी सर्व प्रश्न केले. प्रथमतः मला असे समजावून घ्यावयाचे होते की, मुलीला काही शारीरिक व्यथा आहे की काय? कारण ब-याच वेळा हकिकत सांगणारी माणसे करणी, पिशाच्च या संबंधीच सांगत असतात. त्यांच्या सांगण्यावरून आपण त्या दृष्टीकोनांतून त्या तक्रारीचा विचार केल्यास 'इजा एक व उपचार दुसरे' असे होते. त्याकरिता प्रत्येक तक्रारीचे व्यवस्थित संशोधन झाले पाहिजे. मुलीच्या आईकडून ज्यावेळी मी सर्व इतिहास ऐकून घेतला. त्यांवेळी मी ठरविले की, ही मुलगी कुठेतरी झपाटलेली आहे. हे नक्की झाल्यावर मी त्यांना विभूती भारून दिली. त्या दिवशी

विनायकी चतुर्थी होती. मुलीच्या आईस म्हटले, मी दिलेली विभूती थोडी-थोडी घेऊन व श्री गजाननाचे नाव घेऊन मुलीवर शिंपडावी. चमत्कार असा की, ती मुलगी सुमारे दोन तासातच बरी झाली. त्यानंतर मात्र दोन दिवस विभूतीचा उपयोग केला. असे केल्याने अंगात पुनः संचार होत नाही व त्यामुळे आत्मविश्वास वाढतो.

## चमत्कार २१ वा

माझ्याकडे एक मुंबई उपनगरातील दैवज्ञ बाई आली. तिला असह्य शारीरिक पीडा होती. त्याकरिता ती जे जे कोणी काही करावयास सांगत असत ते ते ती करीत असे. इतके करूनही शारीरिक पीडा बरी होईना. तिने आपल्या वाचनात गजानन महाराज शेगाव यांची पोथी, व्यंकटेश स्तोत्र, साईबाबांची पोथी, शनिमहात्म्य, शिवलिलामृत वगैरे नेहमी ठेवले होते. तिची सर्व हकिकत मी ऐकून घेतल्यावर मला असे वाटू लागले की, तिला आणखी काही वाचा-वयास सांगू नये. कारण ती जे जे वाचीत होती ते सर्व काही योग्यच होते. म्हणून माझ्या अतिंद्रिय शक्तिद्वारे मी असा पडताळा घेतला की, ती वाचत असलेल्या ग्रंथांपैकी कुठच्या तरी ग्रंथाचे आवर्तन करावयास पाहिजे काय? मला चटकन उत्तर मिळाले. होय! आवर्तनाची गरज आहे व तेही पण शनिमहात्म्याचे. मी तिला लगेच म्हटले की, दिवसातून तीन वेळा शनिमहात्म्याचे आवर्तन करा म्हणजे तुम्हास बरे वाटेल. संत श्रेष्ठ रामदास स्वामी यांचाही भर आवर्तनावरच होता. त्यांचा उपदेश असा होता की, श्री मारुती स्तोत्र अकरा वेळा एकवीस दिवस वाचल्याने आपल्या मनातील हेतू तडीस जातात. आवर्तनाच्या मागे एवढाच हेतू असतो की, आपल्या मनातील हेतू आपण प्रत्येक दिवशी पुष्कळ वेळा देवतास सांगत

असल्याने आपल्या भोवती त्या दैवतांची कवचे तयार होत असतात व आपले काम जलद होते. माझ्याकडे आलेल्या बाईने मी सांगितल्याप्रमाणे तीन वेळा शनिमहात्म्याची आवर्तने करण्यास सुरवात केली. तीन महिन्यातच गुण आला. वाचकांनी असे प्रयोग करून पहावे. त्यांची संकटे दूर होतील.

## चमत्कार ३२ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक गृहस्थ आले व त्यांनी आपली हकीकत मला सांगितली. त्यावर मी त्यांना म्हटले, मी सांगतो त्याप्रमाणे विभूती प्रयोग सिद्ध करा व मला कळवा. तसे करण्यास सुरवात केली व सुमारे दोन दिवसातच त्या मुलीस गुण आला. काही वेळा तर ज्यावेळी औषधोपचार करून गुण येत नाही त्यावेळी असे प्रयोग करून पहावयाचे असतात. परंतु ह्याबद्दलचे निदान नक्की करावे लागते. ते एक ह्या शास्त्रातील कौशल्य आहे.

## चमत्कार ३३ वा

माझ्याकडे एक मुंबई उपनगरातील मुलगी आली ह्या मुलीचे लग्न कुठेच जमेना. लग्न जमून यावे म्हणून सर्व कांही केले होते व ते सुमारे ७-८ वर्षे चालूच होते नामजप करणे, सिद्ध ग्रंथ वाचणे, पूजा-अर्चा करणे, मंगळवारचे व्रत करणे वगैरे चालू ठेवले होते. तिचा हा प्रश्न ज्यावेळी मी विचारात घेतला त्यावेळी मला कळून चुकले की हिचे लग्न ६ महिन्याच्या अवधीत होईल. योग चालून येत आहे. मी माझ्या शक्तीस विचारणा केली. ही मुलगी बरीच व्रते करीत आहे तरी आणखी कांही करण्याची आवश्यकता आहे किंवा

काय ? मला उत्तर मिळाले, प्रार्थना तयार करून द्या. मी लगेच एक प्रार्थना तयार करून दिली व त्यामुळे ६ महिन्याचा अवधी अवघ्या ४ महिन्यावर येऊन ठेपला व त्यामुळे ते लग्न होऊन व्यवस्थित पार पाडले. हे सर्व योगायोग असतात. शेवटच्या घटकेला माझी प्रार्थना तिच्या कामी यावयाची होती. तरीपण तिच्या दृष्टीने हा चमत्कारच होता.

## चमत्कार ३४ वा

माझ्याकडे एक ठाणे जिल्ह्यांतील मुलगा आला व त्याचे सोबत त्याची आईही आली होती. त्या मुलाची मुख्य तक्रार अशी होती की त्याला सुमारे ८–१० वर्षे काही केल्या शारिरीक व मानसिक असे बरे वाटेना. मुलाकरीता स्पेशालिस्ट डॉक्टरांनी निरनिराळे उपचार घेऊन गेले होते. परंतु कुठे काहीच कळेना. ही मंडळी माझ्याकडे आली व त्यांनी केलेले इलाज मला कथन केले. हे सर्व ऐकल्यावर मला चटदिशी वाटावयास लागले की, यांच्या घराण्यातील मृत मनुष्याची याच्यावर आशा आहे. व त्यामुळे याच्या मानसिक व शारीरिक व्यथा तयार झाल्या आहेत. मी लगेच माझ्या अतिंद्रीय शक्तीद्वारे शोधून काढले व ते खरे ठरले. त्यांना नंतर मी असे म्हटले की, मुलाच्या आजोबाचा फोटो या मुलाने पुजावा व ह्या क्लेशातून दूर करण्याबद्दलची प्रार्थना करावी व त्यांचे आवडीचे पदार्थ मुक्या जनावरांस खाण्यास घालावे. त्यानंतरच या मुलाची मुक्तता होईल. याप्रमाणे करण्यास त्या मंडळीने सुरवात केली. चमत्कार असा की सुमारे १ महिन्यातच मुलाला बरे वाटू लागले अशा ह्या तक्रारीमध्ये देव देवकी करीत न बसता आपणास असे

का होते? याची योग्य कारणे शोधून काढून बंदोबस्त करणे हेच हितावह असते.

### चमत्कार ३५ वा

बोरीवली येथील एका मुलाची तक्रार अशी होती की, रात्रीच्या वेळी हा मुलगा झोपेत अंग काढून नंतर एक सारखा रडत असे. मुलाचे वय सुमारे २ वर्षाचे होते. मुलाच्या आई कडून सर्व हकीकत विचारून घेतली व ह्या मुलास कुणाची तरी दृष्ट लागली आहे असे ठरविले. मुलगा जरी सुंदर नमला तरी धडपड्या होता. मला असे वाटू लागले की, मुलास दोरा भारून द्यावा व आईस प्रार्थना द्यावी. मुलाची आई श्री. अक्कलकोट महाराजांची निस्सिम भक्त होती म्हणून महाराजांची करुणा भाकली व प्रार्थना तयार केली. दोरा तिसऱ्या दिवशी भारून दिला व बांधण्याकरिता शनिवारी सांगितला. असे केल्याने सुमारे ७ दिवसातच मुलाला गुण येण्यास सुरवात झाली, त्यानंतर १५ दिवसानी सर्व तक्रारी संपुष्टांत आल्या. ह्या हकीकती बद्दल दोरा (गंडा) व प्रार्थना ह्या दुहेरी उपायाने चमत्कार घडवून आणला.

### चमत्कार ३६ वा

माझ्याकडे दादर–मुंबई येथील एक बाई, एका दुसऱ्या ओळखीच्या बाई बरोबर आली. तिच्या यजमानावर पोलीस केस होऊन हे प्रकरण कोर्टात चालू होते. त्या बिचाऱ्या बाईवर एक मोठीच आपत्ती कोसळली होती. एक तर परिस्थिती कठीण व केसचा निकाल काय होतो. याकडे लक्ष होते केस बाहेरगावी चालली होती. माझ्याकडे येण्यापूर्वी हे लोक कायदा

जाणणाऱ्या वकीलांकडे जाऊन आले होते. परंतु तिच्या यजमानांची सुटका ह्या केसमधून होईल असे वाटेना. मी या सर्व गोष्टींचा विचार करून त्यांना विभूती भारून दिली व म्हटले की, ही विभूती उशीखाली ठेऊन द्या व तुम्हास तुमच्या केसबद्दल सर्व काही कळून येईल. त्यानंतर ज्या ठिकाणी ही केस चालत होती त्या ठिकाणच्या वकीलास अशी सूचना स्वप्नाद्वारे मिळाली की, ह्या केसमध्ये मॅजिस्ट्रेटकडे अशा पद्धतीवर अर्ज करावा म्हणजे ही केस आपसात राजी होऊन मिटविली जाईल. वकीलसाहेब झोपेतून उठल्यावर त्यानाही आश्चर्य वाटले. त्यांनी वेळ न दवडता आरोपीची भेट घेऊन त्याप्रमाणे मॅजिस्ट्रेटकडे अर्ज दिला. चमत्कार असा की, मॅजिस्ट्रेटने संमती देऊन पोलीस केस निकालात काढली. यापूर्वी या केसचा निकाल असा लागेल. असे कुठच्याही तज्ञ वकीलाने सांगितले नव्हते. एवढेच नव्हेतर आरोपीस शिक्षा होईल. असेच सर्वांस वाटत होते. अशा बिकट पोलीस केसीसमध्ये वकीलांनी कुठच्या मुद्यावर केस चालवावी याबद्दलच्या सर्व सूचना मी विभूतीद्वारे मागवित असतो. तसे केल्याने आपल्या बुद्धीमत्तेवर ताण पडत नाही. परमेश्वर काय मुद्दे देईल ते खरे. असे कित्येक चमत्कार यापूर्वी मी घडवून आणलेले आहेत. बऱ्याच सुप्रसिद्ध वकीलास हार खावी लागली आहे.

### चमत्कार ३७ वा

माझ्याकडे बोरिवली येथील एक बाई आली. त्यांच्या घराण्यांत निरनिराळ्या देवांची पूजा चालू होती. देवीची पूजा,

दत्तपूजा, गणेशपूजा व ग्रामदेवतेची घरामध्ये मानसिक व शारीरीक स्वास्थ नसल्यामुळे त्यांचे मन चंचल झाले होते. त्यानंतर त्याना देवी स्वप्नामध्ये आली. व म्हणाली की, आपण माझी भक्ती करू नका व ती बंद करा. हे दृष्य स्वप्नांत दिसल्यामुळे ही मंडळी फार घाबरून गेली व माझ्याकडे आली. या स्वप्नाचा अर्थ असा होता की, त्यांना ज्या शक्ती पाहिजे होत्या आणि उपयोगी ठरणाऱ्या होत्या. त्यामध्ये तुर्त निदान देवीच्या शक्तिची गरज नव्हती. त्यानंतर लगेच त्यांना श्री. गणपतीचा दृष्टांत झाला श्री. गणपती स्वप्नामध्ये आले. हसले व दूध मागू लागले हे स्वप्न त्यांनी मला सांगितल्यावर मी त्यांना म्हटले की, आपण एक गणपती स्तोत्र आणा व वाचावयास सुरुवात करा. व मुक्या प्राण्यास दूध घालीत जा. आश्चर्य असे की, दुसऱ्या दिवशी त्यांच्याकडे मनुष्य गणपतीचे स्तोत्र घेऊन आला आणि त्यांना वाचावयास दिले. त्या दिवसापासून त्यांची दुःखे निवारण होऊ लागली. केव्हा केव्हा काही शक्तीची गरज नसते ठराविक दुःखे नाहीशी करण्याकरिता ठराविक शक्तीची उपासना करावी लागते. अशा तऱ्हेचा हा एक चमत्कार आहे. एखाद्या वेळी असे स्वप्न कोणास पडल्यास भिऊन जाण्याचे कारण नाही. परंतु ह्या गोष्टीचा अर्थ लावणारा मनुष्य तज्ञ असावा लागतो.

## चमत्कार ३८ वा

माझ्याकडे एक मुंबई उपनगरामधील बाई आली. तिची मुख्य तक्रार अशी होती की घरामध्ये मानसिक व शारिरीक सुख नाही. यापूर्वी ह्या बाईना बरेचसे दैवी इलाज केले होते.

परंतु सुख लाभले नाही. तिचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे पाहिला. मला असा संदेश मिळाला की ह्या बाईने कुत्र्यास दुध घालावे म्हणजे हिच्या मागची पीडा दूर होईल. त्याप्रमाणे ह्या बाईस मी कुत्र्यास दूध घालण्यास सांगितले. ह्यावर तिचे म्हणणे असे होते की, माझ्या घरी एकसुद्धा कुत्रा येत नाही मी काय करावे. त्यावर मी त्या बाईस म्हटले, मी कुत्र्याच्या आत्म्यास आदेश देतो व कुत्रा तुमच्या घरी येऊन दूध पिऊन राहील. आश्चर्य असे की, ही बाई माझ्याकडून घरी गेल्यावर थोडयाच वेळात एक कुत्रा येऊन तिच्या घरी दाखल झाला. एवढेच नव्हे तर त्यांच्या शेजारी रहाणारे एक गुजराथी कुटुंबाने त्यांच्या मनात कुत्रा पाळण्याचे आल्यावरून त्यांनी एका इसमाकडून कुत्रा घरी पाळण्याकरिता आणला. ते पाहून माझ्याकडे आलेल्या बाईस या गोष्टीबद्दल फार आश्चर्य वाटले. त्यानंतर ती बाई ह्या कुत्र्यास सतत दूध घालीत असते. त्यामुळे त्यांच्या घरात सुख समाधान नांदावयास लागले. काही तक्रारीमध्ये मुक्या प्राण्यांचे आत्मे संतुष्ट करावे लागतात. त्याबद्दलचा हा चमत्कार आहे.

## चमत्कार ३९ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक बाई आपल्या मुलीस घेऊन आली. ह्या मुलीचे वय सुमारे ६।७ वर्षाचे असावे. ह्या मुलीस सुमारे दोन तीन वर्षापासून एक सारखा श्वास लागत असे. आईने पुष्कळ वैद्यकीय उपचार केले होते. माझ्याकडे आणण्यापूर्वी मुंबईतील प्रसिद्ध श्वास–दम्यावर इलाज करणाऱ्या स्पेशलिस्ट मुलीला दाखवून आणली होती. तिच्या आईने मुली संबंधी पुढे काय करावे? असा प्रश्न मला विचारला होता.

मी तिला म्हटले. दोन–तीन दिवस जाऊ द्या. मग आ ण पाहू. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मुलीच्या स्वप्नांत मी (लेखक) आले व त्या मुलीस विभूती मारून दिली. व श्वास बरा होईल असे सांगितले. हा झालेला दृष्टांत मुलीच्या आईने कथन केला व लगेच मी तिला विभूती मारून दिली. नंतर असे कळून आले कि, श्वास आटोक्यात आला. त्या मुलीस आता त्रास होत नाही.

## चमत्कार ४० वा

माझ्याकडे मुंबई उपनगरामधील एक ब्राह्मण बाई आली. तिच्या मुलीच्या नाकातून सुमारे ४।५ वर्षांपासून रक्त येत असे मुलीचे वय सुमारे १९।२० वर्षाचे असावे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे डॉक्टरी इलाज सर्व करून बघीतले. परंतु कुठेच काही कळेना. त्यांचा हा प्रश्न मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला व त्यांना विचारले की, प्रथमतः ज्यावेळी नाकातून रक्त आले त्यावेळी ही मुलगी बाहेरून कोठून आली होती की काय? मुलीची आई म्हणाली होय. इतर बऱ्याच मुलींबरोबर माझी मुलगी बाहेरगावी सहलीला गेली होती. तिकडून आल्यावर सुरवात झाली. त्यानंतर त्यांना मी म्हटले, हिच्यावर बाहेरची छाया पडलेली आहे. म्हणून त्यांना दैविक उपचार सुचविले व असे सांगितले की हिच्या नाकातील रक्त औषधोपचाराने बरे होणार नाही. उपचार सुरू केल्यापासून ह्या मुलीस बरे वाटत आहे. दत्तउपासना सुचविलेली आहे. नाकातील रक्त येणे आता जवळजवळ बंद आहे. काही तक्रारीमध्ये औषध काम करू शकत नाही.

## चमत्कार ४१ वा

माझ्याकडे एक ठाणे जिल्ह्यातील मनुष्य आला. त्याची शारीरीक पीडा फार जुनी होती. हा गृहस्थ श्री अक्कलकोट महाराजांचा भक्त होता. या इसमाने बहुतेक सर्व औषधी योजना केली होती. कुठचाही स्पेशालीस्ट ठेवला नव्हता. त्यांचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे पाहीला. एवढेही करून गुण का येत नाही? मला श्री महाराज म्हणाले की, तूर्त त्यांना श्री गणपतीच्या शक्तिची आवश्यकता आहे. मी लगेच त्यांना म्हटले; आपण ज्या ज्या दैवतांना भजता त्यांना भजावयाचे व आपण श्री गणपतीच्या उपासनेत रहा. आश्चर्य असे की, तसे केल्याने सुमारे २ महीन्यातच त्यांना आराम पडू लागला. सध्या त्यांचे बरे आहे. कुठच्या शक्तीची केव्हा गरज लागते हे अशा वेळी पहावयास पाहीले म्हणजे चमत्कार घडून येतात.

## चमत्कार ४२ वा

माझ्याकडे एक बँकेतील मनुष्य आला. हा मनुष्य चांगला धष्टपुष्ट होता. मध्यम वयाचा होता. परंतु त्यास शरीरात वेदना होत होत्या. हा इसम माझ्याकडे आला. त्यावेळी मला म्हणाला, आपण बहुतेक सर्व स्पेशालीस्ट डॉक्टरर्सची औषधे घेऊन थकलो. त्यांचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे पाहिला व त्यांना उपाय सुचविले ते असे. त्यांनी पांच मंगळवार व्रत करावे व मी दिलेली विभूती दररोज थोडी पाण्याबरोबर घेणे. असा प्रयोग सुमारे २ महिने केला. त्यानंतर त्यांना एवढे बरे वाटू लागले

की, आजतागायत फीट्स आल्या नाहीत व शरीरातील वेदना बऱ्या झाल्या. बऱ्याच वेळा ज्यावेळी औषध काम करू शकत नाही. व औषधी शक्ती काहीच गुण आणून देत नाही. त्यावेळी चैतन्य शक्ति जागृत करून रोग्याची मुक्तता करावयाची असते. या चमत्कारात मी असे केल्याने चमत्कार घडला.

## चमत्कार ४३ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक रिटायर्ड मनुष्य आला. त्याची तक्रार अशी होती की, आपले दोन मुलगे कांहीच ऐकत नाहीत. नोकरीचे पैसे घरात आणून देत नाहीत. चार-चार दिवस घरात येत नाहीत. अशा ह्या परिस्थितीमध्ये आपण कांहीतरी उपाय योजना सुचवा असे म्हणाले. त्यांचे सगळे म्हणणे ऐकून घेतल्यावर मला असे वाटू लागले की, त्यांना प्रार्थना व विभूतीतून गुण येईल. मुलाच्या विचाराचे परिवर्तन होऊन ती मुले व्यवस्थित वागू लागतील. मी लगेच त्यांना एक प्रार्थना तयार करून दिली. व दररोज निदान ३ वेळ तरी म्हणावयास सांगितली. व थोडी विभूती मुलांच्या पोटांत जाईल असे करण्यास सांगितले. चमत्कार असा की दोन्ही मुलांचे आश्चर्यकारक परीवर्तन झाले ते दोन्ही मुलगे पगारातील पैसे आणून देऊ लागले व पूर्वीप्रमाणे नित्यक्रम चालू झाले आई-वडिलांना फार आनंद झाला. माझे उपकार मानण्याकरिता माझ्याकडे आले. मी त्यांना म्हटले, परमेश्वराचे उपकार माना माझे नको! तुमच्या दुःखात मी एक माध्यम होतो.

## चमत्कार ४४ वा

माझ्याकडे लालबाग परळ येथील एक गृहस्थ आला. त्यांची तक्रार अशी होती की, त्याच्या घरात एक विशिष्ट ठिकाणी भूतबाधेसारखे प्रकार होत असत. ते प्रकार असे होते की, ज्या ठिकाणी कॉट होती त्यावर झोपल्यानंतर कोणीतरी अदृश्य व्यक्ति येऊन कॉटवर बाजूस बसत असे. किंवा झोपणाऱ्या व्यक्तिस कॉटवरुन खाली ठेवीत असे. त्याचप्रमाणे झोपलेल्या व्यक्तिवर झेप घेतल्यासारखा भास होई. त्या गृहस्थाचे म्हणणे असे होते की, त्यांच्या जागेत इतरत्र कोठेही असा प्रकार होत नसे. यांचा हा बंदोबस्त मी विभूतीद्वारे करून दिला. भारलेली विभूती कॉटवर व आजूबाजूस शिंपडण्यास सांगितले व कुल दैवताच्या नावे श्रीफळ ठेवून अमावस्या व पौर्णिमेस त्या ठिकाणी फोडण्यास सांगितले. मी सांगितल्याप्रमाणे या गृहस्थाने एक महिनाभर केले असेल नसेल तोच या पिशाच्चछाया व इतर होत असलेले भास व प्रकार सर्व कांही बंद झाले. माझ्या समजूतीप्रमाणे हे प्रकरण असे होते की ज्या ठिकाणी यांची कॉट होती त्या ठिकाणी कोणाचा तरी अपघाती मृत्यू झालेला असावा. माझेकडे आलेल्या गृहस्थाने ते कबूल केले. ते पुढे म्हणाले की, एका इसमास अपघाती मृत्यू घडला असावा असे म्हणतात. कांही ठराविक जागा अशामुळे बाधिक होतात.

## चमत्कार ४५ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक मनुष्य आला तो मला म्हणाला की, आपल्या व पत्नीच्या स्वप्नात निरनिराळे साप

दिसतात व केव्हा केव्हा साप चावावयास येतात तर केव्हा केव्हा आम्ही त्यांना मारीत आहोत अशी निरनिराळी स्वप्ने पडतात. अशा तऱ्हेची मागील हकीकत मी मिळविली. वारंवार जागा बदलल्याने असे होते की काय? असा त्यांचा प्रश्न होता. या सर्व गोष्टींचा मी विचार करून त्यांना विभती भारून दिली. चमत्कार असा की, मी भारून दिलेली विभूती रात्री झोपतेवेळी उशीखाली ठेवल्याने त्यांना सर्प संबंधीची पडत असलेली स्वप्ने आपोआप बरी झाली. विभूतीचा हा असा चमत्कार आहे.

## चमत्कार ४६ वा

माझ्याकडे एक मुंबई उपनगरातील मनुष्य आला त्यांच्या मुलीच्या वागण्यात फरक दिसल्यामुळे त्यांना चिंता वाटत होती त्याचप्रमाणे घरातही थोडीफार अस्थिरता दिसून आली. या संबंधी काय करावे? असे विचारण्याकरिता ते माझ्याकडे आले होते. त्यांचा हा प्रश्न मी पाहिल्यावर त्यांना हनुमानशक्ती व प्रार्थनाशक्ती यांची जोड पाहिजे असे दिसून आले मी त्यांना म्हटले आपण व आपली पत्नी कांही महिने हनुमानाची उपासना करावी व मी आपणास एक प्रार्थना लिहून देतो. ती आपल्या मुलीने कांही दिवस म्हणावी. त्याप्रमाणे चालू केले. मी त्यांना असेही सांगितले होते की, प्रत्येक शनिवारी मुक्या प्राण्यास, विशेष करून कुत्र्यास गोड खाऊ घालावा. ज्या दिवशी १ ल्या शनिवारास आरंभ झाला त्याच दिवशी एक कुत्रा यांच्या घरी उंबरठ्यापाशी येऊन ठाण मांडून बसला. कुत्रा आपोआप आल्याचे पाहून उभयता नवरा-बायकोस आश्चर्य वाटले. त्यानंतर त्यांनी कुत्र्यास गोड खाऊ व भोजन घालण्यास

सुरवात केली. हे असे नित्यक्रमाने करीत असता त्यांना बराचसा फरक दिसावयास लागला व सूचनार्थ स्वप्नेही पडावयास लागली अशा तऱ्हेचा हा बदल घडवून आणण्याकरीता हनुमानशक्ति उपयोगी पडू लागली.

## चमत्कार ४७ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक बाई आली. त्यांच्या घरात सुख कसले ते नांदेना! आर्थिक परिस्थिती तशी काही वाईट नव्हती. तिच्या ह्या प्रश्नाचे उत्तर शोधीत असता मला उत्तर असे मिळाले की, त्यांच्या घरातील संबंध त्या कुटुंबावर राजी नव्हते. म्हणून मी त्यांना त्याचें कुलदैव लक्षात घेऊन निरनिराळ्या ५ सोमवारी शंकरावर अभिषेक करण्यास सांगितले. व त्या दिवशी संबंधाच्या नावाने गाईला भोजनपान द्यावे. तिचे म्हणणे असे होते की, आम्ही रहातो तेथे आजूबाजूस गाई दिसत नाही. तेव्हा काय करावे? मी तिला म्हणालो, कुठच्यातरी गाईला त्या दिवशी तुमच्याकडे हजर रहाण्यास सांगून भोजन करण्यास सांगेन. तुम्ही त्याची बिलकूल काळजी करू नका. मी त्याप्रमाणे आदिशक्तीची करुणा भाकली व सोमवारच्या दिवशी गाईस भोजनाकरीता त्यांच्याकडे हजर रहाण्यास सांगितले. चमत्कार असा की, नेमकी गाय भोजनाच्या वेळी त्यांच्या दरवाज्याकडे येऊन ठेपली. व त्या मंडळीने गाईला भोजन घातले व सर्वांना आश्चर्य वाटले. दुसऱ्या दिवशी येऊन ही हकीकत मला सांगितली. हा चमत्कार नव्हे तर काय?

## चमत्कार ४८ वा

माझ्याकडे एक बोरीवली येथील मुलगी प्रश्न विचारण्याकरीता आली. तिचा प्रश्न नोकरी केव्हा मिळेल? असा होता. यापूर्वी तिने ३-४ ठिकाणी तात्पुरत्या नोकऱ्या केल्या होत्या. तिचा हा प्रश्न मी अतेंद्रीय शक्तिद्वारे पाहीला व मला असे कळून चुकले की, तिने पौर्णिमा व्रत करावे. ३ पौर्णिमेच्या आंत तिच्या नोकरीचे कुठेतरी नक्की जमेल. त्या प्रमाणे हे पौर्णिमा व्रत तिने करण्यास सुरुवात केली. मध्यंतरी त्या मुलीच्या वडिलांची व माझी ओळख झाली व ते माझ्याकडे मधून मधून येऊ लागले. केव्हा केव्हा ते आपल्या मुलीच्या नोकरी संबंधी २-३ ठिकाणी बोलाविणे आले आहे. असे सांगत. अशाबद्दलची चर्चा चालली असता मी ज्या खोलीत बसतो त्या खोलीतल्या दत्तमहाराजांच्या तसबिरीवरील एक तांबडया रंगाचे फुल पडले. चट्‌दिशी माझ्या ध्यानात आले की, त्या मुलीचे नोकरीचे जमून येत आहे. ज्यावेळी हे फुल पडले त्यावेळी टेलिफोन कंपनीबद्दल चर्चा चालली होती. आश्चर्य असे की, त्याच कंपनीतून तिला बोलावणे आले. व तिसऱ्या पौर्णिमेच्या पूर्वी टेलिफोन कंपनीत नोकरी मिळाली. ती पौर्णिमा गुरु पौर्णिमा होती.

## चमत्कार ४९ वा

माझ्याकडे एक बाई आपल्या मुलीस घेऊन आली. त्या मुलीस निरनिराळे रंगाचे खडे वापरण्याचा फार नाद होता. ती एक वेळ गोवा प्रांतात गेली असता तिकडे तिला एक खडा एका

इसमाने वापरावयास दिला. त्या खडयाचा रंग डोळ्यात भरण्या-सारखा असल्याने तिला तो वापरावा असे वाटू लागले व अंगठीत बसवून घेऊन वापरण्यास सुरवात देखील केली. परंतु त्यानंतर तिची प्रकृती ढासळू लागली. हे तिच्या किंवा आई वडिलांच्या लक्षांत आले नाही. मुलीने व आईने ज्यावेळी मला नाना प्रकारचे प्रश्न विचारण्यास सुरवात केली त्यावेळी मी चट्दिशी त्यांना विचारले की मुलीच्या बोटांत अंगठीमध्ये कसलाही खडा आहे किंवा काय? ती म्हणाली, होय मी विचारले किती वर्षे झाली. ती म्हणाली, सुमारे ५।६ वर्षे. मी लगेच म्हटले हा खडा तुला लाभ हा करून देणाराच नाही. परंतु तुला होणारी शारिरीक पीडा ह्या खडयामुळे आहे. तरी आजचे आज काढून टाक. त्यानंतर आंगठी काढून टाकण्यात आली. चमत्कार असा की सुमारे २५ दिवसांतच तिच्या अंगावरील ॲलर्जी नाहीशी झाली. खडे वापरते वेळी तज्ञ माणसांचा सल्ला घेणे योग्य आहे. कारण प्रकाश, रंग आपल्यावर प्रभाव पाडू शकतात म्हणून काळजी घ्यावी लागते. या रंगामध्ये मानसिक व शारीरीक व्यवहार बदलण्याची शक्ति असते. हे मी अनुभवाने लिहीत आहे.

## चमत्कार ५० वा

मुंबई उपनगरामधील एक बाई आपल्या मुलास घेऊन आली. ही हकीकत अशी होती की, तिचा मुलगा फारच उनाडपणा करत असे. मुलाचे वय सुमारे ६ वर्षाचे होते. माझ्याकडे येण्यापूर्वी काही प्रख्यात ज्योतिष्याने त्यांना सांगितल्या प्रमाणे शनीची पीडा असेल म्हणून त्याकरिता काही करून

पाहिले, मंगळाची असेल म्हणून केले. ग्रह शांती करून बघितली परंतु ये रे माझ्या मागल्या ! मुलाचा द्वाडपणा चालूच होता. तिचा हा प्रश्न मी अंतिद्रिय शक्तिद्वारे पाहिला. मला उत्तर मिळाले ते असे की ह्या मुलाच्या बाबतींत काहीही केले तरी त्याच्या वयाच्या १० व्या वर्षांपर्यंत द्वाडपणा जाणार नाही. त्याचे मुख्य कारण असे होते की त्याच्या घराण्यातील एक मृत मनुष्य जन्मास आलेला होता व हा मनुष्य त्याच्या मागील जन्मात ८ व्या वर्षांपर्यंत द्वाड होता. एखादा मनुष्य ज्यावेळी पुनः जन्म घेतो त्यावेळी काही हकीकतीत असे बघावयास मिळते की, त्याचे स्वभाव त्या व्यक्तिस दृढांत होतात त्यामुळे दुसरे बाहेरचे कोणतेही दैवी इलाज यशप्राप्ती करून देत नाही.

## चमत्कार ५१ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक बाई नवऱ्यासंबंधी तक्रार सांगण्याकरिता आली. तिचे म्हणणे असे होते की, आपले यजमान क्षुल्लक कारणांवरून आपल्याबरोबर भांडत असतात. त्याचप्रमाणे त्यांच्या मनाचीही चंचलता दिसून येते. हा प्रकार काय असावा म्हणून तिने जिकडे–तिकडे पुष्कळ तपास केला व त्याप्रमाणे ज्योतिषाकडून, मांत्रिकाकडून बंदोबस्त करून पाहिला परंतु अद्याप यश मिळाले नाही. तिचा हा प्रश्न मी ज्यावेळी पाहिला त्यावेळी मी तिला म्हटले, एका जिवंत बाईची नजर तुमच्या संसारावर असून तो कोलमडून पडावा व तुमच्यात फाटाफुट व्हावी अशी त्या बाईची इच्छा, या व्यतिरिक्त तुम्हास ग्रहपीडा नाही किंवा दुसरा कसलाच त्रास नाही. यावर तिने मला, काय करावे ? म्हणून तोडगा विचारला त्यावर मी तिला

विभूती भारून दिली व प्रार्थना दिली. त्यामुळे तिचे आता पूर्ववत चालले आहे. अचूक कारण शोधून काढणे ह्यात माझा हातखंडा आहे व योग्य शक्ति देऊन दुःखे निवारण करणे यांत माझे कौशल्य आहे.

## चमत्कार ५२ वा

माझ्याकडे बोरीवली येथील एक बाई आपला संसार नीट चालावा व आपणास कोणीतरी पेईंगगेस्ट मिळावा असा हेतू मनात धरून आली. तिची ही अशी परिस्थिती होण्यास कोणती कारणे घडली वगैरे संबंधीचा पूर्वइतिहास विचारून घेतला. व तिचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे बघावयाचे ठरविले. एवढ्यामध्ये एक गुलाबाचे फूल श्री अक्कलकोट महाराज यांच्या तसबिरीवरुन पडले. हा फोटो मी बसतो त्या बोरीवली येथील माझ्या जागेत आहे. मी लगेच विचारणा केली. जे गुलाबाचे फूल पडलेले आहे त्याचा अर्थ माझ्याकडे विचारावयास आलेल्या बाईसंबंधीचा कौल आहे की काय? मला उत्तर मिळाले होय. तिच्याकडे येणारा पेईंगगेस्ट आजपासून चार दिवसात येत आहे. व त्यामुळे तिचे दुःख दूर होईल. चमत्कार असा की, तिला चार दिवसात पेईंगगेस्ट मिळाला व तोही एवढा चांगला की त्या बाईची बहुतेक दुःखे त्या इसमाने दूर केली.

## चमत्कार ५३ वा

माझ्याकडे एक उपनगरातील बाई चोरी प्रकरणाविषयी विचारावयास आली. या बाबतीत चोर कोण असावा? या संबंधी नवऱ्याचे व तिचे मत निरनिराळे होते. चोरीसंबंधी मी

सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर तिला म्हणालो, तुम्ही मला अशी एक यादी द्या, तुमचा कुणा कुणावर संशय आहे? त्याप्रमाणे मी तुमचा प्रश्न पाहीन व यादीच्या बाहेरचा चोर असेल तर तसेही सांगू शकेन. त्याप्रमाणे संशयित इसमांची एक यादी करण्यात आली. व मी चोर शोधून काढला. मी शोधून काढलेला चोर त्यांच्या परिचयाचा होता. परंतु मी त्यांना म्हटले की, तुमची वस्तु मात्र मिळणार नाही. आता चोर तोच आहे. याबद्दलचा पुरावा म्हणून त्याला पकडण्यासाठी ५–१० रु. अथवा एखादा दागिना त्याला समजेल अशा ठिकाणी ठेवून द्या. व चोरी करण्यास भरपूर वाव द्या. त्यानंतर तसे केले व दोघासमक्ष झडती घेऊन त्यांची चोरीस गेलेली वस्तू त्याच्याकडे मिळाली. पूर्वीच्याही वस्तू त्याने चोरल्याचे कबूल केले. दिव्यदृष्टी कसकसे चमत्कार करू शकते व लोकांस न दिसणारे असे अनुभव सांगते. त्याबद्दलचे हे एक उदाहरण आहे.

## चमत्कार ५४ वा

माझ्याकडे एक दैवज्ञ ज्ञातीतील बाई आली. तिचा प्रश्न असा होता की, आमच्या घरात वारंवार चोऱ्या होतात. ही भूतचेष्टा आहे की खरोखरच कोणीतरी चोरी करतो आहे. मागील सर्व चोऱ्या कसकशा झाल्या? व कारणे काय असावीत? वगैरे संबंधीची सर्व माहिती त्या बाईकडून ऐकून घेतली. व तिचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे पाहीला मला उत्तर असे मिळाले की, ही भूतचेष्टा नसून घरातील मोलकरीणबाई पद्धतशीर रीतीने चोरी करीत आहे. त्यानंतर मी तिला म्हटले.

त्या बाईला एकवेळ चोरी करण्याची संधी देऊन बघा. त्याप्रमाणेच सुमारे ८ दिवसातच तशा तऱ्हेची चोरी करण्याची संधी दिली. व बाईला मुद्देमालासह पकडण्यात आली. नंतर तिला नोकरीवरून कमी केले. माझ्याकडे ही बाई येण्यापूर्वी हिला बऱ्याच तज्ञांनी सांगितले होते की, असे कांही घडणे म्हणजे तुमच्या घरात काहीतरी भुताटकी आहे.

## चमत्कार ५५ वा

माझ्याकडे बोरीवली येथील एक वैद्यकीय व्यवसायातील मनुष्य आला. याचा मुख्य प्रश्न आपल्या मुलीची मनःस्थिती कशी सुधारेल ? असा होता. या प्रश्नासंबंधी मी त्यांना इतर कांही प्रश्न विचारले व असेही म्हटले की आपल्या मुलीला औषधोपचार देऊन किंवा मानसोपचार तज्ञाला दाखवून का पहात नाही. ते मला म्हणाले की, माझा जास्त विश्वास दैवीक सामर्थ्यावर आहे ! मी त्यांना म्हटले ठीक आहे. आपण काय ते पाहू. त्यानंतर मी त्यांना विभूती भारून दिली व उशीखाली ठेवण्यास सांगितली. व जे स्वप्न पडेल ते कळविण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी त्यांना असे स्वप्न पडले की एक वानर त्यांना झाडावर दिसला. व काही वेळातच ते स्वप्नातून जागे झाले. हे स्वप्न मला कथन करण्याकरीता ते माझ्याकडे आले. व स्वप्नाची वेळ वगैरे सांगितली. मी त्यांना लगेच म्हटले आपण ७ महिन्यापर्यंत श्री हनुमानाच्या उपासनेत रहा. शक्य झाल्यास ही उपासना तुम्ही पत्नी व मुलगी या तिघांनी चालू ठेवावी. असे केल्याने तुमच्या मुलीच्या मनःस्थितीत नक्कीच फरक पडेल ! त्याप्रमाणे काही दिवसातच त्यांना मुलीमध्ये फरक

दिसून आला. शक्तिचा उपयोग केव्हा व कसा करायचा, कुठल्या प्रसंगी, योग्य शक्तिची कोणती? याची जाणीव करून घेऊन नंतर चमत्कार घडवून आणावयाचा असतो.

## चमत्कार ५६ वा

बोरीवली येथील एक जोडपे माझेकडे आले. त्यांना असा संशय होता की, आपणावर कोणीतरी करणी केली आहे. त्यांचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे पाहिला व मलाही असे कळून आले की त्यांच्यावर करणी प्रयोग झालेले आहेत. त्यांची इच्छा करणी करणाऱ्यांची नावे समजावी अशी होती. मी त्यांना म्हटले नावे समजावून घेण्यापेक्षा आपण करणीचा बंदोबस्त करू या? असे सांगून मी त्यांना दोन दिवसानंतर या असे सांगितले. तेवढ्या मुदतीत त्यांच्या घरी येऊन करणीचा बंदोबस्त करून गेलो. हे स्वप्न सांगण्याकरिता ती माझ्याकडे आली. मी त्यांना म्हणालो बरे झाले. सुंठीवाचून खोकला गेला. तुम्हास आता दुसरे काही करावयास नको, असे मला वाटते. त्यांना काहीतरी सांगितले पाहिजे व द्यावयास पाहिजे म्हणून भारलेली विभूती घरात ठेवण्यास सांगितली. त्यांच्या घरातील सर्व मंडळीस बरे वाटत आहे. परमेश्वर त्यांचे संरक्षण करो.

## चमत्कार ५७ वा

माझ्याकडे एक मुंबई उपनगरामधील गृहस्थ आले. त्यांचे घरात मधून मधून कॉट हालणे, भांड्यांचा आवाज होणे, वगैरे होत असे. असे हे कित्येक दिवस चालू होते. असे त्यांचे म्हणणे होते. एवढेच नव्हेतर त्यांचे वडीलही मंत्र जाणणारे होते.

या गोष्टीचा काहीतरी बंदोबस्त करावा म्हणून आज कित्येक वर्षे त्यांचे प्रयत्न चालू होते. परंतु कायमचा बंदोबस्त काही होईना. ह्या मागे काय असावे ? याबद्दलचा पूर्व इतिहास त्या गृहस्थाकडून जाणून घेतला व मी विचार केला; ज्या खोलीत अशातऱ्हेचे प्रयोग होतात. त्या ठिकाणी संताचा फोटो पूजेस लावावा. व त्यांना दिवाबत्ती करण्यास सांगावी. त्या शिवाय मी त्यांना विभूतीही भारून दिली. त्यांच्या ह्या रहात्या जागी परमपूज्य टेंबे महाराज उर्फ वासुदेवानंद सरस्वती यांचा फोटो मी त्यांना लावण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्याने तो फोटो एका मित्राकडून मिळवून त्या ठिकाणी लावला व पूजा–अर्चा दिवा–बत्ती चालू केली. विभूती शक्ति ही पण त्यांच्या जोडीस दिली. चमत्कार असा की, त्या दिवसापासून पिशाच्च पळाले ते आजतागायत. ही हकीकत सुमारे ४ महिन्यापूर्वीची आहे.

## चमत्कार ५८ वा

मुंबई उपनरातील एक वकील माझ्याकडे आले. ते जागेसाठी खटपट करीत होते परंतु त्यांना कुठेही यश मिळेना. त्यांनी मला जेव्हा हा जागेचा प्रश्न विचारला. त्यावेळी मी त्यांना म्हटले. सध्या जागेची परिस्थिती फार बिकट आहे. तरी मी तुम्हांस काय भविष्य सांगणार. आपला हा प्रश्न निदान माझ्यातरी भविष्याच्या कक्षेत येत नाही. तरीपण ते म्हणाले, तुम्ही मला काहीतरी सांगितलेच पाहिजे ! अगदीच गळी पडल्यामुळे मी त्यांना विभूती भारून दिली व म्हणालो, रात्री झोपतेवेळी उशीखाली सात दिवसापर्यंत ठेवा व ज्या सूचना मिळतील त्याप्रमाणे करा. त्यांना अशा सूचना मिळाल्या की,

आपला एक नातेवाईक अमक्या ठिकाणी रहातो. त्याच्या-मार्फत जागेची खटपट करा, म्हणजे जागेचा प्रश्न सुटेल. माझ्याकडे आलेला हा गृहस्थ सूचनेप्रमाणे आपल्या नातेवाईकाकडे गेला व त्याने जागेसंबंधी त्यांना सांगितले. ते म्हणाले, माझ्या एका मित्राची जागा आहे. ती मी तुम्हास अल्प मोबदल्यावर द्यावयास लावतो. त्याप्रमाणे ती जागा काही एक आढेवेढे न घेता त्यांना मिळाली. बऱ्याच वेळा अशा तऱ्हेच्या सूचना, संदेश मी विभूती देऊन त्या त्या व्यक्तिंना आणून देत असतो.

## चमत्कार ५९ वा

हा लिहीत असलेला चमत्कार थोडासा विचित्र आहे. पण खरा आहे. माझे एक स्नेही वकील मजकडे नेहमी येत असत. हे घराणे वकीलीमध्ये नामांकित होते. जमिनीसंबंधीच्या केसीस या घराण्यातील वकीलांनी चालवून बरेच यश मिळविले होते. त्यांच्याकडे येणारे पक्षकार त्यांच्यावर फार खूष असत. त्यांच्याकडे एक सिव्हील केस अशी आली की, त्या संबंधीचे मुद्दे त्यांना सुचेनात आणि केस तर जिंकलीच पाहिजे अशी होती. नाहीपेक्षा त्यामध्ये घराण्याची अब्रू जाण्यासारखी होती. त्यावेळी ते मला म्हणाले, अशा ह्या परिस्थितीमध्ये तुम्ही मला काही पॉइंट्स् सुचवाल काय ? मी त्यांना हसून म्हणालो, मी काही कोणी तुमच्यासारखा वकील नाही. तरीपण तुम्ही माझे मित्र आहात. त्याकरिता मी तुम्हास मुद्दे मिळविण्याचा मार्ग दाखवितो. नंतर मी त्यांना म्हणालो, तुमचे वडील तर अशा केसीममध्ये फार हुशार होते. त्याकरिता मी सांगतो तसे तुम्ही करा. मी तुम्हास विभूती भारून देतो. ती पुडी तुम्ही

तुमच्याकडे ठेवा व आपले वडील ज्या ठिकाणी बसत उठत होते, तिकडे आपण बसत जावे. म्हणजे ३ दिवसाच्या आत तुम्हास आपोआप त्यांच्याकडून मुद्दे सुचविले जातील. ज्या ठिकाणी तुम्ही झोपाल त्यावेळी तुम्हास सूचना मिळेल. ते मुद्दे आपण त्या केसमध्ये कोर्टामध्ये न्यायाधिशापुढे मांडावेत. म्हणजे केसचा निकाल तुमच्यातर्फे होईल. चमत्कार असा की, त्यांना मुद्याची सूचना दुसऱ्या दिवशीच मृत वडिलांकडून मिळाली व त्यांनी केस जिंकली. त्यांना पक्षकाराकडून चांगलेच पैसे मिळाले व मृत वडिलांनी त्यांची अब्रू राखली.

## चमत्कार ६० वा

माझ्याकडे एक मुंबई उपनगरामधील बाई आली व ती मला म्हणाली की, मला एक महिन्यापूर्वी एकाएकी फीट आली त्यानंतर तिने डॉक्टरी इलाज करण्यास सुरवात केली, परंतु तिला बरे वाटेना. ज्या ठिकाणाहून ही बाई माझ्याकडे आली तिकडील आजूबाजूच्या मंडळीने माझी शिफारस केल्यामुळे ही बाई माझ्याकडे आली होती. ह्या बाईचा सर्व वृत्तांत ऐकून घेतल्यानंतर मी तिला म्हणालो, औषधाने तुम्हास बरे वाटणार नाही. कारण तुमच्या बाबतींतले निदान निराळेच आहे. त्यानंतर त्या बाईस मी विचारले की, तुम्हास ज्यावेळी प्रथमतः फीट आली त्यावेळी तुम्हा कुठून तरी बाहेरून आला होता काय? ती म्हणाली, होय. नंतर मी तिला म्हणालो, काही ठराविक जागा बाधिक असतात, तशी ती जागा होती. म्हणून मी तिला विभूती भारून दिली व घरातील कोणीही इसमाने ओवाळणी काढून सुपारी किंवा नारळ हवनात टाकण्यास सांगितले. व मी

दिलेली विभूती पाण्याबरोबर थोडी थोडी घेण्यास सांगितली. आश्चर्य असे की, त्या बाईला नंतर केव्हाच फीट आली नाही.

## चमत्कार ६१ वा

प्रभादेवी रोडवरील एक मराठा ज्ञातीतील बाई माझ्याकडे आली. ती ज्यावेळी माझ्याकडे आली त्यावेळी मला फार कष्टी दिसली. तिची तक्रार अशी होती की, तिचा नवरा सुमारे १० वर्षे तिच्याकडून दूर होऊन एका दुसऱ्या बाईच्या छंदात पडला होता. या बाईने १० वर्षाच्या अवधीत आपला नवरा परत यावा म्हणून देव–देवकी, मंत्र–तंत्र–यंत्र प्रयोग जे जे कोण काही सांगेल ते सर्व काही करून पाहिले. सरते शेवटी ही बाई माझ्याकडून काहीतरी इलाज होतील ही आशा मनाशी बाळगून विश्वासाने आली होती. तिने ज्यावेळी मला हा प्रश्न सांगितला व पूर्वइतिहास कथन केला, त्यावेळी मी श्री वेतोबाचे ध्यान केले व श्री वेताळ आराधना ही पुस्तिका तिला काढून दिली व म्हटले, दररोज न चुकता श्री देव वेतोबाच्या फोटोचे दर्शन घ्यावे, आतील मंत्र म्हणावा तुझी प्रार्थना श्री देव वेतोबास सांगावी. त्याप्रमाणे बाईने विश्वास ठेवला व सुरवात केली. चमत्कार असा की, ३ महिन्याच्या आतच अशा घटना घडल्या की, त्या बाईचा नवरा ज्या दुसऱ्या बाईबरोबर होता, तिच्यापासून परावृत्त झाला व पुन्हा आपल्या पत्नीकडे प्रभादेवी येथे आला. माझ्याकडे आलेल्या बाईस पतीला पाहून आश्चर्य वाटले. तिचा आपल्या डोळ्यावर विश्वास बसेना. पती घरी आल्यावर पत्नीस म्हणतो, माझ्या विचारांचे परिवर्तन करणारा व मला त्या बाईपासून मुक्त करणारा असा हा मनुष्य

आहे तरी कोण? मला त्यांची तावडतोब भेट घ्यावयाची आहे. त्यानंतर ती बाई आपल्या पतीस घेऊन माझ्याकडे आली. हा चमत्कार मी घडवून आणला असा मला अहंकार मनातही शिवला नाही. या चमत्काराचे श्रेय माझे आवडते दैवत श्री देव वेतोबा यांनाच दिले पाहिजे. मी एक फक्त माध्यम ठरलो. परमेश्वर त्यांना सुखी ठेवो.

## चमत्कार ६२ वा

माझ्याकडे एक पूर्व बोरिवली येथील एक बाई आली. तिला बऱ्याच दिवसांचा चर्मरोग होता. माझे नाव सर्वामुखी असल्यामुळे मी काहीतरी इलाज सुचवितो असे बऱ्याच लोकांस माहीत झाले आहे. ही बाई माझ्याकडे आली तेव्हा ती मला म्हणाली की, यावर दैविक योजना सांगावी? त्याचप्रमाणे औषधी योजना केल्यास बरे व दैविक योजना याप्रमाणे करावी ती अशी–रुद्राला अभिषेक, एक रुद्र अंगावर घालणे व 'ॐ नमः शिवाय' हा नाम जप करणे. माझ्याकडे येण्यापूर्वी ही बाई दोन संतांकडे विचारून त्यांचा सल्ला घेऊन माझ्याकडे आली होती. मी तिला जे काही सांगितले याबद्दलचे आश्चर्य त्या बाईस वाटले. चमत्कार असा की, बाईची प्रकृती दोन्ही इलाज केल्यापासून चांगलीच सुधारलेली आहे. परमेश्वर तिला त्या रोगापासून मुक्त करो व सुखी करो.

## चमत्कार ६३ वा

माझ्याकडे एक शिक्षिका आली. तिचा प्रश्न असा होता की, आपला मुलगा फार उनाडपणा करतो. मुलाचे वय ७

ग्रॅथ आहे. तरी ग्रहाची शांती करावी की काय? तिचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे पाहिला. मला उत्तर असे मिळाले की, त्या मुलास ग्रहाची पीडा नाही. परंतु हा मुलगा त्यांच्या घरातील मृत पावलेला मनुष्य पुनःजन्मास आला आहे व तो नऊ वर्षेपर्यंत असाच उनाडपणा करणार. त्या बाईस मी म्हटले, तुमच्या कुटुंबातील 'मृत पावलेल्यापैकी' हा मुलगा जन्मास आलेला आहे. तरी तुम्हांस तसे वाटते काय? ती बाई मला लगेच म्हणाली, आमच्या घरात असेच म्हणतात. माझे चुलत सासरे दिसावयास याच मुलासारखे होते. एवढेच नव्हेतर त्यांचे दोन दांत पुढे होते. तसेच या मुलाचे आहेत. आवाजही पण तसाच व चालणेही पण तसेच. मग मी त्या बाईना म्हटले की, हा मुलगा वयाच्या ९व्या वर्षापासून सुधारेल. उनाडपणा करणार नाही. परंतु त्यापूर्वी सुधारणा व्हावयास पाहिजे तर तुम्ही चुलत सासऱ्याच्या नावे त्याची ओवाळणी काढावी. तसे केल्याने बरीच सुधारणा दिसत आहे. अशा ह्या तक्रारीमध्ये नक्की कारणे शोधून काढावयाची असतात.

## चमत्कार ६४ वा

माझ्याकडे बोरीवली येथील एक बाई आपल्या मुलासंबंधी विचारणा करण्यासंबंधी आली. तिचा मुलगा वारंवार आजारी पडत असे. डॉक्टरी इलाज पुष्कळ करून पाहिले. परंतु व्यर्थ. मी तिला म्हटले की, याकरिता एक गंडा मंत्रवून देतो तो गळ्यात बांधावा. त्याप्रमाणे त्यांना मी गंडा दिला व तो मुलाच्या गळ्यात घालण्यात आला. चमत्कार असा की, मुलगा औषधाविना

सुधारला व काही दिवसांनी गळ्यातील दोरा आपोआप गळून पडला. आज तो मुलगा पूर्णपणे शरीर सौख्यात आहे.

### चमत्कार ६५ वा

माझ्याकडे एक ब्राह्मण बाई आपल्या मुलासंबंधी विचारण्यासाठी आली. तिचा प्रश्न असा होता की, आपला मुलगा नोकरीवर असूनसुद्धा आपल्याकडे पैसे मागण्यास येतो. तरी काय केले असता हे बंद होईल? तिचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे पाहिला. मला उत्तर मिळाले की, त्या बाईने आपली ही तक्रार हनुमानजीला सांगावी. कारण हिचा मुलगा हनुमान भक्त आहे, मी त्या बाईस सांगितले व म्हटले, सवडीप्रमाणे एकवेळ आपल्या मुलास माझ्याकडे घेऊन या. त्याप्रमाणे ती आपल्या मुलास २।३ दिवसातच घेऊन आली. मुलगा माझ्याकडे आल्यावर मी त्यास विचारले, तुमची हनुमानावर फार भक्ति आहे. हे खरं की नाही. ते म्हणाले, होय. तुम्हास कसे कळले? मला सर्वकाही कळते. नंतर मी त्यांना जय मारुती जप दिला. त्या दिवसापासून मुलापासून आईला होणारी कटकट कमी होऊ लागली. आता ती आई आनंदात आहे.

### चमत्कार ६६ वा

माझ्याकडे गिरगावातील एका बाईच्या मार्फत एक जोडपे आले. त्यांनी मला अनेक प्रश्न विचारले. मूळव्याध औषधाविना जाईल काय? कारण यापूर्वी मूळव्याधीवर पुष्कळ औषधे घेऊन ते गृहस्थ थकले होते. मी त्यांना म्हटले, मी तुम्हास विभूती भारून देतो व एक नाम जप देतो. त्याप्रमाणे तुम्ही करीत

जावे. म्हणजे हळू हळू बरे वाटेल. त्यांचा दुसरा प्रश्न मी कुठचा खडा वापरावा असा होता. यापूर्वी त्यांना ३–४ ज्योतिषांनी गुरुचा खडा वापरण्यास सांगितले होते. त्यांनी कुठचा खडा वापरावा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे बघितला व बुधाचा खडा वापरावा म्हणून शिफारस केली. ते म्हणाले. माझ्याकडे ह्या खड्याची अंगठी पडून आहे. तरी मी उद्यापासून वापरण्यास सुरुवात करीन. लगेच त्यांनी तसा निर्णय घेतला, सुरुवात केली व आश्चर्य असे की त्यांचा उद्योगधंदा भरभराटीस येऊ लागला. मूळव्याधीचा त्रासही कमी होऊ लागला. मी लोकांना कुठचा खडा वापरावा किंवा वापरू नये याबद्दलचे मार्गदर्शन अचूक करीत असतो.

## चमत्कार ६७ वा

माझ्याकडे एक बँकमध्ये काम करणारी बाई आली. तिला बँकेतर्फे होणाऱ्या परीक्षेस बसावयाचे होते. परंतु परीक्षेत पास होईन असा आत्मविश्वास वाटेना. ती श्री अक्कलकोट महाराजांची भक्त आहे. मी परीक्षेस बसू किंवा नको? हा प्रश्न ज्यावेळी मला विचारण्यात आला. त्यावेळी तिचा हा प्रश्न मी श्री अक्कलकोट महाराजांनाच विचारला. महाराज मला म्हणाले, तिला परीक्षेस बसू द्या. अवघड विषय नक्कीच सुटतील. त्याप्रमाणे त्या बाईस मी धीर दिला व परीक्षेस बसण्यास सांगितले. ती मला म्हणाली, माझा अभ्यास जेमतेम झालेला आहे. मी तिला म्हणालो, माझ्याकडील भारून दिलेली विभूती परीक्षा सुरू होण्यापूर्वी डोळ्यास लाव, श्री महाराजांचे नाव घे व विभूती डोळ्यासमोर धरून मी नक्की यश मिळवीन असे

विचार कर. त्याप्रमाणे ती बाई कबूल झाली. काही दिवसातच परीक्षा झाली. अवघड विषयात उत्तीर्ण होऊन श्री महाराजांकरिता पेढे घेऊन आली. चमत्कार असा की, तिच्याबरोबर बी. कॉम., एम्. कॉम. पास झालेले बँकेमधील नोकर ती पास झालेल्या विषयांत उत्तीर्ण होऊ शकले नाहीत. महाराजांची लीला अगाध आहे. मी निमित्तास कारणीभूत झालो.

## चमत्कार ६८ वा

माझ्याकडे एक मुंबई उपनगरामधील बाई आली. तिचे यजमान बँकेमध्ये मोठे अधिकारी आहेत. ते जोडपे सुख–समाधानात असलेले त्यांच्या नातेवाइकांस पाहवले नाही. त्यांचे असे म्हणणे होते की, आमच्यावर कोणीतरी करणी केली आहे. ह्या गोष्टीचा पुरावा म्हणून कपड्यावर काळ्या फुल्या, अंगातून वारंवार घाम वगैरे चालू होते. घामाकरिता पुष्कळ डॉक्टरी इलाज केले होते. परंतु घाम थांबेना. हे असे का होते? ह्या बद्दलची विचारपूस करण्याकरिता ही बाई माझ्याकडे आली. मी लगेच समजून गेलो की, ही एक करणीच आहे. त्याकरिता इलाज म्हणून त्या बाईला विभूती भारून दिली व मी म्हटले, तुमची पूजा–अर्चा आटपल्यावर ज्या मनुष्याचा तुम्हास संशय आलेला आहे त्याचे नाव बोलून ही विभूती फुंकावी म्हणजे काळ्या फुल्या बंद होतील व घाम येणार नाही. असे ३ दिवस केल्यानंतर सर्व काही थांबले. हा चमत्कार नव्हे काय?

## चमत्कार ६९ वा

माझ्याकडे विलेपार्ले येथील मराठा जातीपैकी एक जोडपे आले होते. बाईला स्वप्नामध्ये वारंवार साप दिसत.

या गोष्टीचा उलगडा करून घ्यावा व त्याचा बंदोबस्तही करावा असा हेतू होता. ज्यावेळी ह्या जोडप्याने ज्या वेळी ही गोष्ट मला कथन केली त्यावेळी मी त्यांना विचारले की, तुमचे कुलदैवत श्री शंकर आहेत किंवा काय? ते म्हणाले, होय. माझा दुसरा प्रश्न असा होता की, तुमचे लग्न झाल्यावर तुमच्या कुलदैवतांचे दर्शन घेतले आहे काय? ते म्हणाले नाही. त्यांचे कुलदैवत कुठेतरी सातारा जिल्ह्यांत होते. मी त्यांना म्हणालो, तुम्ही प्रथमतः तुमच्या कुलदैवताचे दर्शन घ्या व तिकडेच तुम्हाला तुमच्या प्रश्नाचा खुलासा होईल त्याप्रमाणे माझ्याकडे आलेले जोडपे कुलदैवतची भेट घेण्यास गेले. तिकडेच त्यांना त्यांच्या प्रश्नांचे उत्तर मिळाले. ही हकीकत मला जाऊन आल्यानंतर सांगितले. मी लगेच त्यांना म्हणालो. तुम्हाला लौकरच मुलगा होईल. काळजी करु नका. तुम्हाला मी दुसरे काही सुचवित नाही. कारण तुमच्या कुलदैवताने तुम्हाला सर्व काही सूचित केलेले आहे. असे हे चमत्कार असतात.

## चमत्कार ७० वा

माझेकडे एक गोवा प्रांतातील मुलगा आला. तो बी. ए. होता. त्याने ३१४ ठिकाणी नोकरीची खटपट चालविली होती. त्यापैकी एका कंपनीने त्यास दोन महिन्याच्या आतच नोकरीस ठेवू असे आश्वासन दिले होते. ह्या कंपनीची शाखा गोवा प्रांतात २ महिन्यात उघडावयाची असे नक्की होते. ह्या मुलाचा नोकरी संबंधीचा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे पाहिला. मला असे उत्तर मिळाले की, सदरहू मुलगा सांगत असलेली कंपनीची

शाखा निदान ६ महिने तरी उघडत नाही. परंतु या मुलास अनपेक्षित दुसऱ्या ठिकाणी मात्र तात्पुरती नोकरी मिळेल व तीही एक महिन्याच्या आत. त्यानंतर त्यांचे नातेवाईकांचे मार्फत त्यास एक महिन्याच्या आत तात्पुरती नोकरी मिळाली व जी कंपनी २ महिन्याच्या आत उघडणार होती. त्या कंपनीने मुदत पुढे ढकलली असे सांगण्याकरिता तो मुलगा माझ्याकडे आला व मला म्हणाला, तुमचे हे शास्त्र काही अजब आहे. कारण मी तुम्हाला सांगितलेली कंपनीची गोवा येथील शाखा दोन महिन्यात न उघडता ६ महिन्यात उघडणार असे तुमचे म्हणणे १०० टक्के खरे ठरले.

## चमत्कार ७१ वा

माझ्याकडे रत्नागिरी जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील एक माणूस आला. तो पदवीधर होता. त्यास मनासारखी कोठे नोकरी मिळेना. याची कारणे काय आहेत? ती जाणून घेण्याकरिता तो माझ्याकडे आला. मी सर्व काही ऐकून घेतल्यानंतर हे असे का होते? ते पाहू लागलो. पहाता पहाता मला असे आढळून आले की, या मनुष्यास मारुती रायाची शक्ति व शनी ग्रहाच्या शक्तिची आवश्यकता आहे. मी त्यास म्हटले, तुम्हास मारुती स्तोत्र व शनी उपासना करावी लागेल म्हणजे मनासारखी कायमची नोकरी मिळेल. त्यानंतर ते म्हणाले, आपण पूर्वी शनिवार करीत होतो व मारुतीची उपासनाही चालू होती. परंतु काही कारणांमुळे त्यामध्ये खंड पडला. मी नंतर त्यांना म्हणालो, खंड पडल्यामुळेच आपणास यश आले नाही. नित्यनियमामध्ये खंड पडल्यास यशप्राप्ती कमी. माझ्या सांगण्यावरून

या मनुष्याने मी सांगितलेली उपासना पुन्हा चालू केली व त्यांचे मनाप्रमाणे काम झाले व तेही थोडयाच अवधीत.

## चमत्कार ७२ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक गुजराथी बाई आली. तिचा प्रश्न असा होता की, माझ्या मुलाचे लग्नाचे कोठे जमत नाही. काहींना काहीतरी अडथळे येत असतात. तिचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिध्दारे बघतला व तिला म्हटले, तुझ्या मुलास ५ मंगळवारचे व्रत करण्यास सांग व त्या मुदतीत मुक्या प्राण्यांना भोजन घालीत चला. चमत्कार असा की, ४थ्या मंगळवारी त्या मुलाचे लग्न ठरले. आईस आश्चर्य वाटले. साखरपुडा झाल्यानंतर मला देण्याकरिता मेसूर, मिठाई घेऊन आली व म्हणाली, तुम्ही सांगितल्याप्रमाणे माझ्या मुलाचे लग्न जमले. त्याकरिता ही मिठाई. मी तिला म्हटले, मुक्या प्राण्यांना थोडी मिठाई खाण्यास घाला. हा एक योगायोगच होता. फक्त माझ्याकडून हा चमत्कार घडावयाचा होता.

## चमत्कार ७३ वा

माझ्याकडे एक रत्नागिरी जिल्ह्यातील कनकवली ह्या गावचा इसम आला होता. त्याची तक्रार अशी होती की, आपल्या बायको-मुलास नेहमी आजारपणा असतो. पैसे कितीही मिळविले तरी बरकत नाही. त्यामुळे सुख, शांती समाधान हेही पण आमच्या कुटुंबात नाही. माझ्याकडे येण्यापूर्वी हा इसम अनेक ज्योतिषांकडे व भगत लोकांकडे गेला होता. प्रथमतः त्या मनुष्याकडून त्याच्या घरांतील सर्व इतिहास समजावून

घेतला व मी त्यास म्हणालो, या गोष्टीचे कारण तुमचे कुलदैवत व घरचा मूळ पुरुष यांची कृपा तुम्हावर नाही. त्याचप्रमाणे तुमच्याकडून तुमच्या बायकोची ओवाळणी झाली पाहिजे म्हणजे सर्व काही ठीक होईल. मी सांगितलेले तोडगे त्याला पसंत पडले व तो इसम काही दिवसातच कनकवली येथे गेला व कुलदैवताचे, मूळ पुरुषांचे सर्व विधी पार पाडले. मी सांगितल्याप्रमाणे ओवाळणी केली. चमत्कार असा की, त्याला २ महिन्याच्या आतच सुखसमाधान शांती मिळू लागली. अशी हकीकत त्याने मला येऊन सांगितली.

## चमत्कार ७४ वा

माझ्याकडे रत्नागिरी जिल्ह्यातील फोंडा गावाचा एक मनुष्य आला. हा मनुष्य सरकारी नोकरीत आहे. त्याचा लग्न संबंधीचा प्रश्न होता. त्यास ५।६ वर्षात असा अनुभव आला की, लग्न करण्यास निघाला की काहीना काहीतरी अडचणी तयार व्हावयाच्या व लग्न तहकूब ठेवावे लागे. हे असे अनुभवण्यास का येते? असे त्यास वाटत होते. त्याचा हा प्रश्न मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला व त्यास कुलदैवताच्या प्रित्यर्थ उपासना सुचविली. व विभूती भारून दिली. याचा परिणाम असा झाला की, त्या मुलाचे लग्न अकस्मात् १५ दिवसाच्या आत जुळून आले. हे लग्न जुळविण्याच्या बाबतीत त्याचा एक स्नेही कारणीभूत झाला. काही गोष्टी योगायोगाने घडत असतात. त्याचवेळी अशा तऱ्हेचे चमत्कार पाहण्यास मिळतात.

## चमत्कार ७५ वा

माझ्याकडे ठाणे येथील एक मनुष्य आला. त्याचा प्रश्न असा होता की, आपले घरगुती काम गावी कोकणात जाऊन करून घ्यावयाचे आहे. परंतु ज्या ज्या वेळी मी घरी जाण्याचे ठरवितो किंवा नक्की करतो. त्यावेळी शिंका होत असतात. तरी हा शकून आहे का अपशकून आहे. त्याचा हा प्रश्न मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला. मला उत्तर मिळाले की, या इसमाने कोकणात आपल्या घरी जाऊ नये कारण तिकडे काहीतरी गडबड आहे. त्याप्रमाणे त्याने आपला बेत तहकूब केला व गावी एका मनुष्यास पत्र लिहून आपल्या घरी काय चालले आहे, त्याबद्दलचा खुलासा मागविला. काही दिवसातच त्याचे असे उत्तर आले की, तुमच्या घरी बरीच गडबड चालू आहे. तुम्ही न येणे बरे. त्याप्रमाणे हे मनुष्य आपल्या घरी गेले नाहीत. शिंकाद्वारे सूचना मिळाली होती.

## चमत्कार ७६ वा

बोरीवली येथील एक बाई माझ्याकडे आली व म्हणाली, आमच्या ब्लॉकवर सतत १५।२० दिवस दगडफेक होत असते. दगड पडण्याची वेळ सुमारे ८॥ ची असते. असे हे नित्यनियमाने चाललेले आहे. त्यावर मी तिला म्हटले, एखादेवेळी कोणीतरी हे दगड मारीत असेल किंवा मुलांचेही पण काम असेल. त्यानंतर ती बाई मला म्हणाली की, असा हा संशय पूर्वी आम्हासही येत होता. म्हणून आम्ही पहारा ठेवला व खात्री करून घेतली की, बाहेरून दगड मारणारा कोणीही नाही. हे काहीतरी

करणीचे प्रकरण आहे. किंवा भूत पिशाच्च करीत आहेत. परंतु मी एवढ्यावरच थांबलो नाही. त्या बाईला आणखी अनेक प्रश्न विचारले व ज्यावेळी माझी खात्री झाली की, हे प्रकरण काहीतरी निराळे आहे. तेव्हा मी तिला विभूती भारून दिली व रात्री ८॥ च्या पूर्वी विभूती फुंकावयास सांगितले. असे ३ दिवस करून मला कळवा, असेही त्या बाईस सांगितले. ४ थ्या दिवशी बाई माझ्याकडे आली व म्हणाली, आमच्या ब्लॉकवर आता एकही दगड पडत नाही. सगळे काही सामसूम. या प्रयोगात मी विभूती कामी आणून प्रतिकार केला. असा हा चमत्कार.

## चमत्कार ७७ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक बाई आली व ती मला म्हणाली, माझ्या सर्वांगास एकसारखा घाम येत असतो. तो एवढा की, पुसून काढावा तेवढा थोडा. याबाबतीत मी सर्व काही डॉक्टरी इलाज केले. परंतु घाम येण्याचे बंद होत नाही. तिचा हा प्रश्न मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला व मला असे आढळून आले की, ही करणी आहे. यावर औषधी इलाज उपयोगी पडणार नाहीत. लगेच त्या बाईस मी विभूती भारून दिली व म्हटले की, आपली देवपूजा आटोपल्यावर मी दिलेली विभूती फुंकून टाका. असे दोन दिवस केल्यानंतर त्या बाईस येणारा घाम बंद झाला. तिला एवढे आश्चर्य वाटले की, आज आपण शेकडो रुपये खर्च करून जे झाले नाही ते फक्त विभूतीने अवघ्या दोन दिवसातच काम केले. या गोष्टीचे तिच्या नवऱ्यासही आश्चर्य वाटले व तिचे यजमान मला भेटावयास आले. हे विभूतीचे गौडबंगाल आहे तरी काय

मी त्यांना म्हणालो, चमत्काराशिवाय नमस्कार नाही. हे मी थट्टेने म्हणालो.

## चमत्कार ७८ वा

बोरीवली पश्चिम येथे एका घरात चोरी झाली. त्यांची भांडी चोरीस गेली होती. त्यांनी ठिकठिकाणी चोरीचा तपास केला होता. परंतु मागमुस लागेना. त्यानंतर ही मंडळी माझ्याकडे आली व चोरी कोणी केली असेल याबद्दल विचारु लागली. मी त्यांना म्हटले, तुम्ही संशयास्पद मनुष्यांची यादी तयार करा व मला विचारा. यादीमधील एका मनुष्याचा दाट संशय त्यांना येत होता. मी त्यांना म्हटले, हा मनुष्य नाही. तुम्ही त्याचा विनाकारण संशय घेत आहात. ज्यावर संशय नव्हता अशा एका मनुष्याचे नाव निघू लागले व काही दिवसातच तो इसम मुद्देमालासह पकडला गेला व त्यानंतर त्या मंडळींना ह्या बद्दलचा आनंद झाला. ही हकीकत त्यांनी मला लगेच कळविली.

## चमत्कार ७९ वा

माझ्याकडे एक डॉक्टर आले. ते मुंबई उपनगरामध्ये प्रॅक्टीस करत असत. त्यांचे बरोबर एके दिवशी त्यांची पत्नीही पण आली. त्यांचे मुख्यतः केस संबंधीचे प्रश्न होते. विरुद्ध पार्टी कडून त्यांना बराच त्रास सोसावा लागत असे. एवढेच नव्हे तर ही केस कोर्टात जाऊन मारामारी पर्यंतचा प्रसंग उद्भवतो की काय? असे त्यांना वाटत होते. त्यांचा हा प्रश्न पाहील्यावर

मला असे उत्तर मिळाले की त्याच्या संरक्षणा करिता श्री हनुमाना-सारखी अफाट शक्तीची गरज आहे. याचा विचार करून मी त्यांना माझ्याकडचे श्री. वेताळ आराधना हे पुस्तक वाचावयास दिले व श्री. वेताळाची प्रार्थना करण्यास सांगितले. थोडयाच दिवसात असे आढळून आले की त्याच्या विरूद्ध पार्टीचे सर्व लोक नरम पडले. व त्यांच्या त्रासांतून मुक्त झाले. श्री वेताळ आराधना अद्‌भूत चमत्कार घडवून आणतो. अशी लेखकाची श्रद्धा आहे. ज्यांना ज्यांना म्हणून मी हे वाचावयास सांगितले त्या सर्वांना अनुभव आलेल आहेत. फक्त ज्यावेळी ह्या शक्तीची आवश्यकता आहे. त्यावेळीं मी त्यांना शक्ति सुचवित असतो.

## चमत्कार ८० वा

माझ्याकडे मुंबई उपनगरामधील एक इसम दिवाणी केसीस संबंधी विचारावयास आला. त्यास असा संशय येत होता की, आपल्या केसमधील वकील आपल्या विरूद्ध पार्टीला सामील झाला आहे. त्यांचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिद्वारे विचारला व तो खरा ठरला. मी त्यांना म्हटले तुमचा संशय बरोबर आहे. त्यानंतर ते माझ्याकडून आपल्या घरी गेले. घरी जाण्यापूर्वी माझ्याकडे असलेल्या आनंदमूर्तीच्या तसबिरीस व श्री. अक्कलकोट महाराजांच्या तसबिरीस नमस्कार केला. ते झोपी गेले असता त्यांना दृष्टांत झाला की, एक ब्राह्मण नरसिंह सरस्वतीच्या रूपात आले व म्हणाले, श्री. कोठारी यांनी तुम्हास सांगितलेले बरोबर आहे. तुम्ही दुसरा वकील करा, व ते ब्राह्मण गुप्त झाले. श्रद्धा ठेवल्यावर असे चमत्कार घडून येतात.

## चमत्कार ८१ वा

मुंबई उपनगरात रहाणाऱ्या एका कुटुंबांतील मुलगा बॉम्बे सेंट्रलवर एस्. टी. तिकीट काढण्यास गेला. बऱ्याच उशीरा पर्यंत तो परत न आल्यामुळे मुलाच्या आईस काळजी वाटू लागली. म्हणून ती माझ्याकडे सुमारे रात्री ९ वाजता आली. तिचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिधारे पाहीला व तिला सांगितले की तुझ्या मुलास तिकीटा करीता बऱ्याच मोठ्या रांगेत उभे रहावे लागले व आता त्यास तिकीट मिळून तो परतला आहे. ५० मिनिटांतच घरी येऊन पोहचेल. चमत्कार असा की, तो मुलगा ५० मिनिटांच्या आंत सुरक्षित येऊन पोहोचला.

## चमत्कार ८२ वा

माझ्याकडे एक दादर येथील मुलगा येत असे. प्रथमतः हा मुलगा आई वडिलांसह माझ्याकडे आला. त्याला अल्सरची व्यथा होती. आईवडिलांच्या सांगण्यावरून त्यांनी सर्व कांही औषधी योजना केली होती. आयुर्वेदीक, होमियोपॅथिक, निसर्गोपचार वगैरे पद्धतीनुसार पण इलाज करून बघितले होते. त्याचप्रमाणे त्यांच्या माहितीत असलेल्या संत साधूकडे दैविक इलाज चालूच होते. या मुलाचे बाबतीत जेवढा कांही पूर्व इतिहास पाहिजे होता तेवढा मी त्यांना विचारून घेतला व विभूती भारून दिली. त्यांना नंतर मी म्हटले; तुम्हास जी जी कांही स्वप्ने पडतील ती सर्व लिहून ठेवा. म्हणजे मग आपण काय ते पाहू ! त्यानंतर काही स्वप्ने त्याला पडली. त्या आधारे मी त्यांना श्री शंकरभक्तिपर पदे म्हणण्यास

सुचविले. चमत्कार असा की, सुमारे ३ महिन्यातच त्यांची ही व्यथा बरी झाली.

### चमत्कार ८३ वा

माझ्याकडे अंधेरीचा एक मनुष्य आला. त्याचेवर कित्येक दिवसांपासून ब्रह्मसमंधासारखे वारे होते. माझे नाव ऐकून हा इसम माझ्याकडे आला होता. माझी व याची पूर्वीची ओळख नव्हती. हा इसम ज्यावेळी माझ्याकडे आला. त्यावेळी त्याच्या अंगावर वारे खेळत होते. म्हणून मी त्यास म्हटले की, माझ्या जागेत असलेल्या दत्तमहाराज व श्री अक्कलकोट महाराज यांचेकडे पहात रहा. त्याप्रमाणे त्याने फोटोकडे बघण्यास सुरूवात केली. त्यानंतर काही वेळातच अंगावरील वारे गेले. नंतर मी त्यास विभूती भारून दिली. चमत्कार असा की, त्यानंतर हा गृहस्थ माझ्याकडे ३ वेळा आला. नेहमी विभूती लावणे व थोडी पाण्याबरोबर पोटात घेणे. असे केल्याने अंगावरील खेळणारे वारे बंद झाले. त्यास पूर्वी होणारा त्रास सुटला.

### चमत्कार ८४ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक बाई आली. यापूर्वी ही बाई माझ्याकडे निरनिराळे प्रश्न विचारण्याकरिता येत असे. यावेळी एका मनुष्यास ती घेऊन आली होती. त्या मनुष्याची बायको प्रसुतीकरिता हॉस्पिटलमध्ये दाखल केली होती. त्या मनुष्याचा प्रश्न असा होता की, एका प्रसिद्ध स्पेशालिस्ट डॉक्टरच्या म्हणण्यावरून आपली बायको दुसऱ्या दिवशी बाळंत होणार ! तरी कसे काय ? मी त्यांना म्हणालो, आपली बायको

बाळंत होण्यास ३ दिवस लागतील व मुलगा होईल. चमत्कार असा की, त्यांची बायको तिसऱ्या दिवशी बाळंत झाली व मुलगा जन्मास आला.

## चमत्कार ८५ वा

माझ्याकडे विलेपार्ले येथील एक बाई आली. तिची तक्रार अशी होती की, आमचे कुटुंब सुमारे १८।२० वर्षे सुखी असे नाही. नंतर ती पुढे असे म्हणाली की, आम्ही सांपत्तिक दृष्टीने तसे पहावयास गेल्यास सुखी आहोत. परंतु घरात शांतता व शारीरिक सौख्य नाही. मी तिच्याकडून मागील इतिहास विचारून घेतला व त्यांचा हा प्रश्न मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला व त्यानुसार मला असे कळून आले की, ते रहाते असलेली वास्तू भुजंगाची आहे. त्यांनी ही जागा सोडून जावे नाहीपेक्षा भुजंग सेवेत रहावे. ही गोष्ट त्या बाईला कथन केली. तिलाही चटदिशी पटली कारण त्या जागेत वारंवार भुजंग दिसत असतात. जागा सोडून जाणे ही पण गोष्ट कठीण म्हणून त्यांना भुजंग सेवेकरिता निरनिराळे उपाय सुचविले. त्यामुळे हे कुटुंब सुखी पावले.

## चमत्कार ८६ वा

माझ्याकडे बोरीवली येथील एक मुलगी येत असे. या मुलीचा व माझा परिचय बोरीवली येथे झाला. त्यानंतर काही दिवसांनी या मुलीच्या स्वप्नात सापाचे दर्शन होत असे व काही दिवस तिला चक्कर येत असे. हा प्रकार काय असावा. याची छाननी करून घेण्याकरिता तिने मला

विचारले व मी तिला सांगितले की, तुला शंकर भक्तीची आवश्यकता आहे. ती चालू कर. चमत्कार असा की, ती चालू केल्यापासून सापाचे दृष्टांत थांबले व चक्करही येणे बंद झाले. त्यानंतर तिची तक्रार आजतागायत माझ्या कानावर आली नाही.

## चमत्कार ८७ वा

माझ्याकडे बोरीवलीचा एक मनुष्य नोकरीसंबंधी विचारण्यास येत असे. त्याचे म्हणणे असे – मी कुठेही नोकरीच्या खटपटी-करिता गेलो तरी काहीना काहीतरी अडचणी दत्त म्हणून उभ्या असतात. हे असे का होते? त्याचे म्हणणे असेही होते की, आपण ग्रहांची शांतीपण केलेली आहे. तरीपण हा प्रकार आहे. त्याचा हा प्रश्न मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला व त्यास म्हटले की, तुम्ही यापुढे ज्यावेळी नोकरीकरिता अर्ज कराल त्यावेळी मारुतीरायाची आठवण करा. त्याचप्रमाणे तुम्हास कोठून नोकरीचे बोलावणे आल्यास मारुतीरायाचे दर्शन घेऊन बाहेर पडा. ते म्हणाले, यापुढे आपण सुचविल्याप्रमाणे करीत जाईन तसे त्यांनी करण्यास सुरूवात केली. चमत्कार असा की, सुमारे २ महिन्याच्या आतच त्यांना चांगली नोकरी मिळाली. कुठच्याही अडचणी आल्या नाहीत. योग्य त्या कामी योग्य ती शक्ति मिळाल्यावर असे अनुभव येतात.

## चमत्कार ८८ वा

माझ्याकडे माहीम येथील एक मनुष्य काही प्रश्न विचारण्याकरिता आला. हा गृहस्थ एका कंपनीत नोकरीस आहे.

त्यांचा प्रश्न असा होता की, आपण सुमारे १५।१६ वर्षे बेचैन असून आपणास कंपवात आहे. या शारीरिक पीडेचे कारण काय असावे? म्हणून निरनिराळ्या स्पेशालिस्टांकडून तपासणी करून घेतली. परंतु हमखास असे काही कारण सापडेना. एखाद्या वेळी हार्टचा त्रास असेल आणि त्यामुळे तसे होत असेल म्हणून हार्ट स्पेशालिस्टांकडून तपासणी करून घेतली. त्यांच्याकडूनही नक्की असे निदान बाहेर पडेना, अनेक औषधे घेऊन बघितली. परंतु पीडा दूर झाली नाही. त्यांचा हा प्रश्न मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला व मला असे उत्तर मिळाले की, त्यांना हा अशा तऱ्हेचा रोग होऊ द्या, म्हणून कोणीतरी विचार केला होता. ज्या मनुष्याने हे विचार केले त्यास अशाच तऱ्हेची पीडा होती. मला अशा तऱ्हेची जाणीव मिळाल्या-वर मी त्यांना विचारले की, तुम्हास ज्यावेळी ही पीडा सुरू झाली, त्या दरम्यान तुमच्यावर अशाच पीडेच्या माणसाची नजर पडली होती किंवा काय? तेव्हा ते मला लगेच म्हणाले, होय! ज्या पीडेने आज मी पछाडलो आहे अशाच पीडेने पछाडलेल्या माणसाची मी थोडी फार चेष्टा केली होती व त्यास ती आवडलीही नव्हती. त्यानंतर सुमारे १५ दिवसांच्या आतच त्याच्याप्रमाणे मला होवू लागले. मी त्यास नामजप, प्राणायाम व विभूती इत्यादि उपाय सांगून रोग आटोक्यात आणलेला आहे. अशा तऱ्हेची पीडा हळू हळू जात असते.

### चमत्कार ८९ वा

माझ्याकडे बोरीवली येथील एक बाई काही ना काही प्रश्न विचारण्याकरिता वारंवार येत असे. त्यांचा विश्वास

माझ्यावर होता. ती बाई मला म्हणाली हल्लीच मला ८।१० दिवस संसाराचे विचार करीत असता पाल चुकचुकणे ऐकावयास येते व त्यामुळे तिला भिती वाटू लागली. तिचा हा प्रश्न अतिंद्रीय शक्तिद्वारे पाहिला. भिण्याचे कारण नाही, असे उत्तर मिळाले. पाल का चुकचुकली? याचे मुख्य कारण असे होते की, त्यांच्या घरातील एक जीवाला कांही आठवण करून देत होता. या प्रकरणी त्या पालीस म्हणजे त्या जीवात्म्यास बाईच्या वतीने मी अशी विनंती केली की, पालीने चुकचुकणे बंद करावे. चमत्कार असा की, त्या दिवसापासून पालीचे चुकचुकणे बंद झाले.

## चमत्कार ९० वा

माझ्याकडे एक बोरीवली येथील बाई आली. तिला व घरातील इतर मंडळींना काहीतरी शारीरिक क्लेष होते. या संबंधी घराण्यातील पुरुषांनी आपल्या कुलदैवताकडे कौल घेतले होते. परंतु कांही तपास किंवा मागमूस लागला नव्हता, कौल घेणारे इसम स्पष्टीकरण करू शकले नाहीत, त्यामुळे त्यांच्या मागे हा त्रास बऱ्याच वर्षांचा होता. त्यांच्यावर झालेल्या करणीचा शोध मिळाल्यामुळे मी त्यांना योग्य उपाय सुचविले व त्यातून त्यांची मुक्तता केली. देवाला कौल लावून विचारणे व नक्की काय आहे ते ठरविणे हा एक बुद्धीमत्तेचा व कौशल्याचा विषय असतो. कौलाचा अर्थ लावण्यात माझा हातखंडा आहे. मी त्या बाबतीत बराच अनुभव घेतलेला आहे.

## चमत्कार ९१ वा

माझ्याकडे माहीम येथील एक गृहस्थ आले. तसे पाहू गेले असता ते मला सुखवस्तु दिसले. असे असले तरी त्यांचेच त्यांना असे वाटत होते की, आपल्या घरात काहीतरी न्यूनता आहे व याबद्दलचा प्रश्न त्यांनी मला विचारला. त्यांच्या प्रश्नाचा ओघ असा होता की, आपल्या घराण्यावर कुलदेवीची अवकृपा आहे की काय? याचे कारण असे होते की, ज्या ज्या वेळी ते आपल्या कुलदैवताकडे कौल घेत असत त्यावेळी त्यांची देवी काहीतरी नड दाखवत असे. याचे स्पष्टीकरण त्यांना कौल घेणाऱ्या इसमाकडून कित्येक दिवस मिळाले नव्हते. मी त्यांना लगेच म्हणालो, आपल्या देवीस मी इकडून विचारणा करतो! ती मला काही सांगू शकते का ते पाहू. मी देवीस अतिंद्रिय शक्तिद्वारे विचारणा केली. तिच्याकडून मला उत्तर मिळाले ते असे, यांच्या घराण्यात दरसाल देण्यात येणारा नवस बंद झाल्यामुळे आपण नडीचे कौल देतो. हे मी सांगितल्यावर त्यांना आश्चर्य वाटले. माझे त्यांनी कौतुक केले ते म्हणाले, आम्ही आता पत्राद्वारे कौल घेणाऱ्या इसमाकडून खुलासा करून घेतो. नंतर काही दिवसांतच मी सांगितलेले खरे ठरले.

## चमत्कार ९२ वा

माझ्याकडे दादरचे एक ब्राह्मण गृहस्थ आले होते. त्यांचा मुलगा आपले डोके फिरयून वारंवार घरातून पळून जात असे. हे गृहस्थ श्री दत्तमहाराजांचे भक्त आहेत. नित्यनियमाने गुरुचरित्र वाचणे व इतर वेळ श्री दत्तपूजा करणे. यामध्ये वेळ

घालवितात. त्याचप्रमाणे ते भाविकही पण आहेत. त्यांनी आपल्या मुलाकरिता ग्रहशांती व दैवी इलाज केले होते. परंतु मुलगा पळून जाण्याचे बंद झाले नाही व मुलातही विचारांचे परिवर्तन काहीच दिसून येईना. त्यांचा हा प्रश्न मी अतिंद्रीय शक्तिधारे पाहिला व मुलामध्ये सुधारणा होईल काय? किंवा असाच राहील? असे पाहिले. मला उत्तर मिळाले की, आणखी काही दिवसांतच सुधारणा होईल व ती कायमची होईल. त्यानंतर मी त्यांना विभूती भारून दिली व म्हटले की, यातील थोडी विभूती त्यास पाण्याबरोबर द्यावी व एवढ्या दिवसांत आपली मुलाबद्दलची तक्रार कयमची जाईल. चमत्कार असा की, काही दिवसांतच त्यांची ही तक्रार कायमची गेल्यावर त्यांनी येऊन मला सांगितले. त्यावेळी त्यांचा मुलगा माझ्याकडे आलेला होता. त्यास पाहता त्याच्यामध्ये मला बरीच सुधारणा दिसून आली.

## चमत्कार ९३ वा

माझ्याकडे एक गुजराथी इसम येत असे. हा मनुष्य मुंबई उपनगरात रहाणारा असून एका मोठ्या कंपनीत नोकरीस आहे. यास भविष्यविषयचीही फार आवड आहे. म्हणून हा मनुष्य माझ्याकडे काहीना काहीतरी विचारण्यास येत असे. काही कामानिमित्त हा माणूस आपल्या गावी गुजराथ प्रांती सुमारे १५ दिवसांकरिता गेला. ज्या घरात हा रहाण्यास होता, तिकडे एका पिशाच्चाने त्याच्या देहात शिरकाव केला. त्यामुळे ते कसेसेच वागू लागले. तिकडील काही मंडळींनी मांत्रीकांना बोलावून पिशाच्च काढण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे विभूती,

गंडा वगैरे दिले. काही दिवसांनी हा गृहस्थ नेहमीप्रमाणे माझ्या-कडे आला. मी त्यांना बघितल्यावर ते बेचैन झालेले पाहिले व त्यांना पिशाच्चाने पछाडलेले माझ्या लक्षांत आले. मी माझ्या अतिंद्रीय शक्तिद्वारे याची विचारणा केली व त्यांना म्हटले, माझ्याकडे असलेल्या श्री दत्तमहाराज व श्री अक्कलकोट महा-राज यांच्या फोटोसमोर थोडा वेळ पहात रहा तुम्ही नक्की चार दिवसांमध्ये सुधाराल. तुमच्यावरील छायेस निघून जाण्यास सांगितले. आहे. चार दिवसांवर ते राहू शकत नाही हे नक्की समजावे. चमत्कार असा की, चार दिवसांतच पिशाच्चाने अंग सोडले व निघून गेले. माझे मित्र पूर्ववत् झाले हाच आनंद.

## चमत्कार १४ वा

माझ्याकडे दादर येथील एक माझ्या सारस्वत ज्ञातीपैकी गृहस्थ आला. त्यांच्या घराण्यात आज कित्येक वर्षे समंधाची नड होती. त्यांचा एक मुलगा ऐन तारुण्यात मरण पावला होता. या बाबतीत त्या जिवात्म्याची काय इच्छा आहे ? व आपल्या घराण्यात त्याचा उपद्रव आहे किंवा काय ? हे त्यास जाणून घ्यावयाचे होते. दिवसेंदिवस हे घराणे आर्थिकदृष्ट्या खालावत चालले होते. हे घराणे अतिशय भाविक आहे व त्यांचा विश्वास कौल व अंगावर वारे येणे यांच्यावर आहे. असे असूनही त्यांच्या प्रश्नांचे निरसन माझ्याकडे येईपर्यंत कोणीच केले नव्हते. ते माझ्याकडे आले त्यावेळी मी त्यांचा मागील सर्व इतिहास ऐकून घेतला व त्यांना विभूती भारून दिली व म्हटले की, रात्री झोपतेवेळी विभूती उशीखाली घेऊन झोपावे म्हणजे काही दिवसातच

तुम्हास संदेश येईल. त्याप्रमाणे सुमारे ५–६ दिवसांतच स्पष्ट संदेश मिळाला. त्यानंतर हा गृहस्थ माझ्याकडे आला व त्याने आपले संदेश मला कथन केले. मी त्याचे स्पष्टीकरण करून त्यास समाधान करून दिले. अशा कित्येक तक्रारीमध्ये मी विभूती भारून देऊन संदेश आणीत असतो.

## चमत्कार ९५ वा

माझ्याकडे दादर येथील एका ब्राह्मण बाईच्या ओळखीने त्यांची एक शेजारीण आली. तिचा प्रश्न असा होता की, आपल्या मुलावर कोणीतरी करणीचा प्रयोग केलेला असावा, त्यामुळे मुलाच्या करमणुकीत भलताच फरक दिसून येत आहे. तसाच तो व्यसनाधीनपण झालेला आहे. हा तिचा मुलगा चांगल्यापैकी मोटर मॅकॅनीक आहे. त्या बाईस मी नाना प्रकारचे प्रश्न विचारून, पहिल्या प्रथम हा करणी प्रयोग आहे किंवा काय? याची खात्री करून घेतली. तिचा हा प्रश्न मी पहात असता माझी खात्री झाली की, ही कोणाची तरी मुलाच्या धंद्यातील, व्यवसायातील लोकांची करणी आहे. ह्या करणीविरुद्ध इलाज म्हणून तिला नवनाथ पोथीतील नववा अध्याय वाचण्यास देण्याची आज्ञा झाली. चमत्कार असा की, लगेच मुलामध्ये सुधारणा दिसून आली व ही बाई ज्या ठिकाणी नवनाथ पोथी वाचत असे तिकडे तिला आपोआप विभूती दिसून आली. माझ्या अनुभवानुसार करणीवर नववा अध्याय एक तोडगा आहे.

## चमत्कार ९६ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरामधील सारस्वत जातीतील एक बाई आली होती. तिचे एक मूल स्पष्ट बोलत नसे. मूल सुमारे ६ वर्षाचे होते. तिने हा प्रश्न मला विचारला, त्यावेळी मी तिला विचारले की, तुमच्या घराण्यामध्ये कोणास तरी असे व्यंग होते किंवा काय? ती बाई मला म्हणाली, होय. या तक्रारीमध्ये तिला उपाय सुचवावे म्हणून तिचा हा प्रश्न अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला. मला उत्तर मिळाले की, कुलस्वामीनीचा नामजप द्यावा व माझ्याकडील विभूती भारून देऊन ती जांभेवर चोळावी. चमत्कार असा की, सुमारे २ महिन्यातच ते मूल स्पष्ट बोलू लागले. अशा ह्या तक्रारीमध्ये औषधी इलाजापेक्षा दैवी इलाजच कामी ठरतात.

## चमत्कार ९७ वा

माझ्याकडे बेळगाव येथील एक बाई आली. तिचा प्रश्न असा होता की, आमच्या घरात सुख, समाधान शांती कसली ती नाही. तरी आम्ही काय करावे? मी तिला अनेक प्रश्न विचारले. हे सुख, समाधान, शांती किती दिवसापासून नाही? वगैरे सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर तिचा हा प्रश्न अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला. मला उत्तर असे मिळाले की, या घराण्यास शंकर उपासनेची आवश्यकता आहे. मी त्या बाईस म्हणालो, तुमच्या कुटुंबातील माणसांना शंकराची उपासना करण्यास सांगा. नंतर चट्कन बाई म्हणाली की, मी तुमच्याकडे येण्यापूर्वी मला आमच्या कुलदेवीचा असा दृष्टांत झाला होता की, तुम्ही शंकराची

उपासना करा म्हणजे तुम्हास सुख, समाधान, शांती मिळेल. स्वप्नामध्ये त्यांची देवी आली व शंकराच्या फोटोसमोर बसली व या बाईला सांगितले, शंकराच्या उपासनेत रहा व ती गुप्त झाली. हे तिच्याकडून ऐकल्यावर मी तिला म्हटले, तुम्ही आजपासून शंकर उपासनेत रहा. चमत्कार असा की, त्यामुळे त्यांना पूर्वीपेक्षा सुख, समाधान, शांती लाभू लागली.

## चमत्कार ९८ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील एक बाई आली होती. तिचा प्रश्न असा होता की, आपला पती थोडा व्यसनाधीन होऊन ५।६ वर्षे आपणास घर खर्चास काहीच पैसे आणून देत नाही. आपल्या पतीची कमाई तसे पाहू गेले असता फारच चांगली आहे. तरी याबाबतीत काय करावे म्हणजे माझा पती सुधारेल व थोडे फार घर खर्चास पैसे आणून देईल. मी तिला एक प्रार्थना लिहून दिली व सतत जेवढा वेळ म्हणता येईल तेवढा वेळ म्हणावी असे सांगितले. एका महिन्यातच परीणाम असा झाला की, तिचे पतिराज नियमितपणे प्रत्येक महिन्यास घर खर्चास लागणारी रक्कम आणून देऊ लागले. त्या बाईस फार आश्चर्य वाटले. ती मला ही हकीकत सांगण्यास आली त्यावेळेस तिचे अंतःकरण भरून आले. श्रद्धावान अंतःकरणे अशा तऱ्हेचे चमत्कार घडवून आणतील.

## चमत्कार ९९ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरातील दैवज्ञ ज्ञातीतील एक इसम आला. हा चांगल्यापैकी कारागीर आहे. परंतु बिचारा सुमारे

वीस, बावीस वर्षे बेचैन परिस्थितीत होता. त्यास काहीना काहीतरी होत असे. स्पेशालिस्ट व मानसोपचारी डॉक्टर काहीच रोग-राई नाही असे सांगत असे. परंतु त्यांना मात्र आपणास काहीतरी होते असे वाटत होते. ते मला हा प्रश्न विचारण्या-करिता आले. त्यावेळी ही आपली तक्रार फारच जुनी आहे असे त्यांनी सांगितले. केव्हा केव्हा कमी जास्त प्रमाण असे आपणास काहीतरी होते. भितीने त्यांच्या शरीरास कंपही सुटत असे. ही तक्रार मला थोडीफार विचित्र दिसली. म्हणून त्यांचा मी पूर्व इतिहास कसून अभ्यासीला. कितीतरी प्रश्न मी त्यांना विचारले असतील व त्यानंतरच त्यांचा हा प्रश्न मी अतिंद्रिय शक्तिधारे पाहिला. उत्तरे मिळत गेली की, ही व्यक्ति औषधाने बरी होणार नाही! शारीरिक पीडा नाही, ग्रहपीडा नाही. त्यांना जर काय आहे तर ते जिकडे पूर्वी रहात होते, तिकडील एका पिशाच्चाने यांच्या देहाचा आसरा घेतला आहे. मी त्यांना तसे सांगितले. त्यांना ते पटले. कारण त्या वेळच्या काही घटना त्यांना सांगितल्या. त्याचवेळी माझ्याकडे एक दुसरे गृहस्थ आले होते. तेही पण म्हणाले होते, त्या वाडीमध्ये अशा तऱ्हेचे प्रकार वारंवार होतात. त्यानंतर त्या मनुष्यास नामजप मी दिला व त्या नामजपामुळे त्यांच्यावरील पिशाच्च छाया दूर झाली.

## चमत्कार १०० वा

माझ्याकडे बोरीवली येथील एक बाई येत असे. तिला ग्रह-सौख्य समाधानकारक नव्हते. ही बाई शिरडीचे श्री साईबाबा यांची भक्त आहे. आज कित्येक वर्षे आपल्या

पतीस घेऊन शिरडीस जावे अशी तिची इच्छा होती. ही बाई आपल्या घरातील दुःखे सांगून त्यातून कसे काय पार पडता येईल. याबद्दल विचारीत असे. मी तिला म्हटले, आपण श्री साईबाबांची भक्तिकरिता तेव्हा तुमचा हा प्रश्न त्यांनाच विचारू ! ती मला म्हणाली, तुम्ही कोणासही विचारा पण मला पैलतिरी घेऊन जा. मी म्हटले, ठीक आहे. आपण तसे करू. मी लगेच शिरडी साईबाबांस विचारणा केली. आपण या बाईस पतिसह शिरडीस केव्हा घेऊन जाता ? व त्यांची दुःखे कशी दूर करता ? श्री साईबाबा मला म्हणाले, १९७३ मधल्या सप्टेंबर महिन्यात घेऊन जातो व नंतर त्यांची दुःखे दूर करतो. चमत्कार असा की, तिच्या पतिच्या मनात काय आले कोण जाणे व त्याने सप्टेंबर महिन्यातील एक दिवस नक्की केला व त्यामध्ये बदल होणार नाही, असे पत्नीस सांगितले. पति-पत्नी उभयता श्री साईबाबांचे दर्शन घेऊन आले. त्यानंतरच त्यांची दुःखे हळूहळू दूर होत गेली. ती बाई मला शिरडीचा प्रसाद घेऊन आली. आनंदाने नाचू लागली धन्य झालो, असे म्हणू लागली. हा खरोखरच चमत्कार होय.

## चमत्कार १०१ वा

माझ्याकडे मुंबई उपनगरामधला एक मनुष्य पत्नीसह वारंवार येत असे. त्यांना सुमारे ६ वर्षाची एक मुलगी होती. आणखी काहीतरी अपत्य असावे अशी इच्छा होती. अशा याबद्दलचा प्रश्न ते जोडपे मला वारंवार विचारीत असे. माझ्याकडे येण्यापूर्वी त्यांनी जरूर ती डॉक्टरी तपासणी करून घेतली होती. मूल होईल किंवा नाही याबद्दल डॉक्टरची मते भिन्न भिन्न होती.

कोणीही काही नक्की सांगू शकत नव्हते. ही मंडळी तरुण असूनसुद्धा अतिशय भाविक असून निगर्वी आहेत. चांगली कमाई असूनसुद्धा मनमिळावू जोडपे आहे. कसलाच अहंकार नाही. धार्मिकतेत काही वेळ घालविणे हा दोघांचाही नित्यनियम आहे. त्यांचा मुला संबंधीचा प्रश्न मी अतिंद्रिय शक्तिद्वारे पाहिला. मला उत्तर मिळाले की, मूल नशिबी आहे. दत्तभक्तिची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे त्यांना मी दत्त उपासना सुचविली व करण्यास सांगितली. चमत्कार असा की, दत्त उपासनेने फलश्रुती झाली व त्यांना मूलप्राप्ती झाली.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क. 15066 दि.
वि.

**समाप्त**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम 14821
क्रमांक 3886 5/3/78

IRBK-0115096